**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे, : अपीलकर्ता
एन-११, बी-१६३/०२, हडको, टी. व्ही. सेंटरजवळ,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अधीक्षक, भूमि अभिलेख औरंगाबाद यांचे कार्यालय,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रमुख लिपिक, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांचे कार्यालय, औरंगाबाद - श्री. सी. बी. बोर्डे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद - श्री. कि. रा. तवरेज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १३-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये कलम ४ बाबत माहिती मागितली आहे व नागरिकांची सनद इत्यादी माहिती मागितली आहे. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीची सीडी स्वरुपात सर्व माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-०३-२०१० ला देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपृष्ठ्यर्थ रुपये ५० इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक २५-०२-२०१० च्या पत्राने कळविले आहे. अपिलार्थीने दिनांक ०९-०३-२०१० रोजी रकमेचा भरणा केला असून त्यानुसार त्याच दिवशी त्यांना सर्व माहिती दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १३-०५-२०१० रोजी सुनावणी घेतली व त्यामध्ये अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती मिळाली आहे असे आढळून आले आहे. तदनुसार अपील निकाली काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीस काही शंका असतील तर जन माहिती अधिकारी, अधीक्षक, भूमि अभिलेख औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधून समाधान करुन घेण्यासाठी प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे, एन-११, बी-१६३/०२, हडको, टी. व्ही. सेंटरजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपीलकर्ता
मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>क. लेखापाल, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. कैलास भिवसन मगरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. टी. डी. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. ११-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी आजपावेतो माहिती अपिलार्थीस देता आलेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांनी १९ जानेवारी २०११ रोजीची कॅशबुकची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्यासोबत आणली आहे. कारण की अपिलार्थी यांनी ज्या तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे ती कॅशबुकमध्ये समाविष्ट होती त्या कॅशबुकच्या झेरॉक्स प्रती त्यांना अभिप्रेत आहेत.

आयोगासमोर आज रोजी ही माहिती अपिलार्थीस देण्यात आली. ती अपिलार्थीने स्विकारली. या माहितीची त्यांनी पाहणी करावी आणि यामध्ये काही अपूर्ण माहिती आढळल्यास अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे आणि त्यानंतर पुढील १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांना मूळ अर्जाच्या संदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुरवावी लागेल.

त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा क. लेखापाल, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांच्यामार्फत सादर करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा क. लेखापाल, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा क. लेखापाल, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख खलील उल्ला बरकत उल्ला, : अपीलकर्ता
बंगला नं. २३, मिल्ट्री हॉस्पिटलसमोर, छावणी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - ॲडव्होकेट श्री. वाजेदखान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. अविनाश भास्करराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. वाजेदखान व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची संचिका त्यांच्याकडे नसून अभिलेख विभागाकडे असल्याकारणाने अभिलेखापाल, महानगरपालिका यांना त्यांच्या दिनांक १९-०६-२०१० रोजीच्या पत्राने सदरची संचिका अभिलेख कक्षात शोधून देण्यात यावी असे कळविण्यात आले. यावर अभिलेखापाल, महानगरपालिका यांनी त्यांच्या दिनांक २२-०६-२०१० रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना उपरोक्त विषयीची संचिकेची अभिलेखात तपासणी केली असता सदर संचिका अभिलेख कक्षात जमा केल्याचे आढळून येत नाही असे कळविले. यावर दिनांक ०१-०७-२०१० रोजी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी तसे कळविले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे निदेश आहेत की, सहायक आयुक्त-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी या संचिकेबाबत तीन कर्मचा-यांचे एक विशेष पथक नेमून या संचिकेचा शोध घेऊन तो एक महिन्यात पूर्ण करण्यात यावा. याबाबतचे रेकॉर्ड ठेवण्यात यावे व संचिका प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस त्याच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य द्याव्या लागतील. संचिका प्राप्त झाली नाही तर तसा निर्णय संचिकेवर नोंदवून त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

सहायक आयुक्त-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी तीन कर्मचा-यांचे एक विशेष पथक नेमून संचिकेचा शोध घेऊन वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खलील उल्ला बरकत उल्ला, बंगला नं. २३, मिल्ट्री हॉस्पिटलसमोर, छावणी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहायक आयुक्त-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी. बी. सोनवणे, : अपीलकर्ता
प्लॉट नं. सी-१९, ४-३५-४०२, गल्ली ०६, गजानन नगर,
गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
वनविभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, औरंगाबाद<br>- श्री. जी. एम. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक, वनविभाग, औरंगाबाद<br>- श्री. आर. पी. पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये त्यांच्या विभागाला रुपये ७२.८० लक्ष मिळालेल्या निधीच्या बाबत विस्तृत अशी विविध माहिती मागितली होती. तथापि कोणत्या योजनेखालील माहिती त्यांना आवश्यक आहे ही बाब त्यांना अवगत होऊ शकली नसल्यामुळे अपिलार्थीस दिनांक ०५-०६-२०१० रोजी कोणत्या योजनेअंतर्गत माहिती हवी आहे ही बाब विचारण्यात आली. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्याची सुनावणी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद यांनी दिनांक १६-०६-२०१० रोजी घेतली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी अपिलार्थीला नेमक्या कोणत्या योजनेअंतर्गत कामाचा तपशील हवा आहे यावर चर्चा करण्यात आली व अर्जदाराने मग्रारोहयो खाली माहितीचा अर्ज आहे असे सांगितल्याचे अपील निर्णयात नमूद केले असून संबंधित माहिती जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, औरंगाबाद यांनी द्यावी असा निर्णय घेतला. याबरहुकूम जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयात पुन्हा ही बाब तपासून पाहिली व त्यांना मग्रारोहयो अंतर्गत कोणताही निधी प्राप्त झाला नाही असे दिसून आले. अपिलार्थी यांना दिनांक १५-०७-२०१० रोजी ही बाब अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित असताना स्पष्ट करण्यात आली. अपिलार्थी यांचे त्यावेळी समाधान झाले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले व अपिलार्थी यांनी पोच दिली आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन ही बाब आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. बी. सोनवणे, प्लॉट नं. सी-१९, ४-३५-४०२, गल्ली ०६, गजानन नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन बी. पाटील, : अपीलकर्ता
व्दारा, एल सेक्टर ८०/१, छत्रपती शिवाजी नगर, हडको,
एन-९, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (पोल ५-ब, पोल-१३)
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५७९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन बी. पाटील | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२<br>- श्री. नवनाथ रा. वाढ | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२<br>- श्री. रु. न. देशमुख | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी ३३ दिवस उशिराने त्यांचे व्दितीय अपील आयोगास सादर केले आहे याची आयोग नोंद घेत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) प्रमाणे विहित मुदतीत व्दितीय अपील दाखल केलेले नाही. अपिलार्थी यांच्याकडून असे वारंवार घडले असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. त्यावरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांचा दिनांक १२-१२-२००९ रोजीचा अर्ज दिनांक २७-०१-२०१० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई यांना कलम ६ (३) अन्वये पाठविण्यात आला आहे अशी माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. या कार्यालयातर्फे पुढे तो अर्ज औरंगाबाद कार्यालयाकडे पाठविण्यात आला. नंतर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथील जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक १२-१२-२००९ च्या माहितीच्या अर्जावर दिनांक १२-०३-२०१० रोजी काही माहिती पाठविली आहे असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही. ती त्यांना घ्यावी लागेल. याकरिता सदरचे प्रकरण पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन बी. पाटील, व्दारा, एल सेक्टर ८०/१, छत्रपती शिवाजी नगर, हडको, एन-९, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तानसेन सुकलाल पारधी,<br>प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या खंडपीठापुढे व्दितीय अपील क्रमांक ५०३/२०१० ची सुनावणी दिनांक ०६.०५.२०११. रोजी झाली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी स्वतः उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण पाच अशा माहितीचे अर्ज त्यांच्याकडे केले आहेत व या पाचही माहितीच्या अर्जाची व्दितीय अपिले कोकण खंडपीठ व औरंगाबाद खंडपीठाकडे केली आहेत. कोकण खंडपीठापुढे या पाचही अर्जाच्या व्दितीय अपिलांवर सुनावणी झाली आहे त्यामुळे या खंडपीठापुढे अपिले घेण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती केली.. अपिलार्थी त्या सुनावणीस उपस्थित होते व त्यांनी त्यावेळी ही बाब मान्य केली आहे.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ११.०५.२०११ रोजी या खंडपीठास दिलेले पत्र आयोगासमोर आहे त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या सर्व माहिती अर्जाच्या विचाराधीन व्दितीय अपिलांवर कोकण खंडपीठापुढे सुनावणी झाली आहे व कोकण खंडपीठाने त्यावर आदेश पारीत केले आहेत असे नमूद केले आहे त्यामुळे सदरचे व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे. या खंडपीठापुढील हे व्दितीय अपील प्रकरण रद्द करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी, प्लॉट नं. ६, गंगा बावडी जवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त

कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजयकुमार जी. हिवाळे, : अपीलकर्ता
मु. पो. वाहेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८१

२ सुनावणीची तारीख दि. १३-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. विजयकुमार जी. हिवाळे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. राठोड आर. एम., कार्यालयीन अधीक्षक

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बि-हाडे एस. एस. विस्तार अधिकारी

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १५-०२-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. २२-०२-२०१०

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीची सीडी विनामूल्य दिलेली आहे. ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना मिळालेल्या माहितीची पाहणी करावी. या माहितीमध्ये त्यांनी मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीनुसार काही माहिती अपूर्ण मिळाली असल्यास त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व त्यावर पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती पुरवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे कळविण्यात आल्यास त्याप्रमाणे त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जाच्या संदर्भातील उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार जी. हिवाळे, मु. पो. वाहेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद, : अपीलकर्ता
मु. पो. भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका, हजरत सिद्दीकशाह उर्दू प्राथमिक शाळा,
कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, हजरत सिद्दीकशाह उर्दू प्राथमिक शाळा, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. अनिल के. महेर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-०४-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. अनिल के. महेर उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. अनिल के. महेर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, एका त्रयस्थ व्यक्तींच्या मुलांची (दोन मुले व दोन मुली) वैयक्तिक माहिती, प्रवेश अर्जाच्या सत्यप्रती, प्रवेश निर्गम रजिस्टरच्या पानाच्या सत्यप्रती व टी. सी. च्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, हजरत सिद्दीकशाह उर्दू प्राथमिक शाळा, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना त्या मुलांच्या वडिलांचा सदर माहिती उघड करण्यास आक्षेप आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी तसे अपिलार्थीस माहिती देता येणार नाही असे दिनांक २३-०४-२०१० रोजी कळविले आहे. वकिलाने त्यांच्या युक्तिवादात असेही सांगितले की, त्रयस्थ पक्षाची (मुलांची )व्यक्तिगत माहिती आहे त्यामुळे उघड करण्यात येऊ नये.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. अपिलार्थी यांना उपस्थित राहून त्यांची बाजू मांडावी लागेल, माहितीने कोणते व्यापक जनहित साध्य होईल याची कारणे द्यावी लागतील. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद, मु. पो. भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, हजरत सिद्दीकशाह उर्दू प्राथमिक शाळा, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ममराज बन्सी राठोड, : अपीलकर्ता
रा. जंगलातांडा, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग,
सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, ल. पा. जिल्हा परिषद उपविभाग,<br>सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. गवळे दत्तात्रय किशनराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. रावसाहेब मिराजी वाघमारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची दिनांक ०१ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ ते ३१-०३-२०१० पर्यंतची जवाहर योजने अंतर्गत कामांची माहिती मागितली आहे. सर्व माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता काही कालावधी लागला. अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे आणि ती अपिलार्थी यांना प्राप्त झाली आहे. अपिलार्थी यांनी याबाबतची पोच त्यांच्या कार्यालयास दिलेली आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२०१० रोजी माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ममराज बन्सी राठोड, रा. जंगलातांडा, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल. पा. जिल्हा परिषद उपविभाग, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामनाथ कडुजी इथापे, : अपीलकर्ता
भगतसिंग नगर हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं. सी-२/९,
हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शेवगांव,
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद,
अहमदनगर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८४

२ सुनावणीची तारीख दि. १३-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत नविन दहीफळ, तालुका शेवगांव,
जिल्हा अहमदनगर - श्री. पवार डी. एस.

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा अनुपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव,
तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

३.४ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उपस्थित
ग्रामपंचायत नविन दहीफळ, तालुका शेवगांव, जिल्हा
अहमदनगर - श्री. चेमटे जी. बी.

३.५ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शेवगांव,

तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर - श्री. ए. व्हि. इंगळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सध्याचे जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनाक २३-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचा युक्तिवाद ऐकून घेता आला नाही तथापि या प्रकरणी प्रथम अपिलावर सुनावणी होणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामनाथ कडुजी इथापे, भगतसिंग नगर हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं. सह-२/९, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय नविन दहीफळ, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.स्वप्निल भास्करराव निकम : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,मुंबई
जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स्वप्निल भास्करराव निकम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई - श्री. एच.एल.भुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई - श्री. डी.टी.देवळे | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. शि.रा.बानाटे,वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० फेरसादर दि.१०.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना यापूर्वी देण्यात आलेली आहे.ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी मान्य केली. तथापि त्यांना काही मुद्यावरील माहिती अपूर्ण मिळालेली आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरुपाची, खुलासेवजा माहिती मागितली आहे. ती अधिनियमातील कलम २(च) मधील माहिती या संज्ञेत बसत नाही. तथापि आयोगाने विचारणा केली असता त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली काही माहिती अप्राप्त असल्याचे सांगितले. ती अप्राप्त माहिती, त्यावरील जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व आयोगाचे निदेश खालीलप्रमाणे आहे.

३) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या ज्येष्ठता यादीच्या प्रती.- ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नव्हती. - त्याप्रमाणे त्यांना अपिलार्थीस कळवावे लागेल.अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रत्येक उमेदवारांची माहिती संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण होत असल्यामुळे त्यांच्याकडे स्वतंत्रपणे अर्ज दाखल केल्यास त्या प्राधिकरणाकडील माहिती अपिलार्थीस मिळू शकेल.

४) मुद्दा क्र. ५,६,७,८ - श्री. खडकीकर,श्री.क्षीरसागर,श्री.बावणे, श्री. शशिकांत पाटील यांच्या नियुक्तीबाबतच्या टिपणीची प्रत त्यांना मिळालेली नाही. - जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, ही माहिती अपिलार्थीस पाठविली आहे. प्रत्येकी एक प्रत अपिलार्थीस पुन्हा द्यावी लागेल.

वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करावी लागेल व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई यांना या प्रकरणात माहिती देण्यास विलंब झाल्याबाबत चौकशी करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),मुंबई यांनी प्रकरणात माहिती देण्यास विलंब झाल्याबाबत चौकशी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वप्निल भास्करराव निकम,७३,प्रणव, महाजन कॉलनी,सिडको,एन-२,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. म.सं.राख,रा.औरंगाबाद : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई
जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.म.सं.राख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई- श्री. एच.एल.भुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई - श्री. डी. टी.देवळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये बरीच माहिती प्रश्नार्थक,खुलासेवजा मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी

सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी मान्य केली. तथापि त्यांना खालील मुद्यांवरील माहिती मिळालेली नाही, असेही त्यांनी सांगितले.

१) एकूण ११६ क्षेत्रिय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यातील किती मागासवर्गीय आहेत. बिंदू नियमावलीनुसार आरक्षित जागेवर नेमणूका करण्यात आल्या त्यांच्या जातीची प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे.

२) ज्या महिला उमेदवारांची नेमणूक करण्यात आली आहे.त्यांचे आर्थिकदृष्टया उन्नत आणि प्रगत गट यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती.

३) वरील मुद्दा क्र. २ प्रमाणे मागासवर्गीय उमेदवारांचे आर्थिकदृष्टया उन्नत आणि प्रगत गट यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती.

४) बिंदू नियमावलीच्या रजिस्टरमधील प्रमाणपत्राची प्रत.

५) कंत्राटी पध्दतीने कार्यालयात काम करीत असताना सेवाप्रवेश नियम शिथिल केले असल्यास शासन नियम/परिपत्रकाची प्रत.

अपिलार्थी यांना वर नमूद केलेली माहिती देय होत आहे.ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. त्याचप्रमाणे असे दिसून येत आहे की,अपिलार्थीस माहिती देण्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंब झालेला आहे. याबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई यांना चौकशी करावी लागेल व अधिनियमातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही योजावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

३) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

४) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), मुंबई यांनी प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबाबत चौकशी करुन अधिनियमातील तरतुदीनुसार उचित कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म.सं.राख, द्वारा श्री. जी.एन.घुगे, प्लॉट नं.जी-८, सिडको, एन-४,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईण्ट,सायन सर्कल,सायन (पूर्व),मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साहेबराव रामराव शिंदे : अपीलकर्ता
रा.शिवराई, ता.कन्नड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कन्नड,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कन्नड,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषी अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद- श्री. ए.एस.कोंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषी अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद -श्री.व्ही.के.पालिमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता रु. १४६/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर माहिती देणे शक्य

होईल, असे दि. ११.०१.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. २८.०१.२०१० रोजी त्यांना एकूण ७० पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर दि. २६.०३.२०१० रोजी सुनावणी घेऊन घेतलेल्या निर्णयामध्ये नमूद केले आहे की, मुद्दा क्र. ४ शी संबंधित विद्युत मोटार पंपाबाबतची माहिती पुन्हा तपासणी करुन द्यावी. त्याप्रमाणे त्यानंतर माहिती दिली आहे. आयोगसमोरील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अप्राप्त आहे हे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत कळवावे लागेल. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना मूळ अर्जाच्या संदर्भातील उर्वरित माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास त्यावर पंधरा दिवसांच्या आत मूळ अर्जासंदर्भात उर्वरित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साहेबराव रामराव शिंदे,रा.शिवराई, पो.बनशेंद्रा,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.अरुण रघुनाथ गायके, : अपीलकर्ता
रा.रेल,ता.कन्नड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी,कन्नड कार्यालय,जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषी अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद- श्री. ए.एस.कोंडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषी अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद -श्री.व्ही.के.पालिमकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी कन्नड तालुक्यातील फळबाग योजना व शेततळे योजना अंतर्गत एकूण किती पात्र लाभार्थी

आहेत त्यांच्या प्रस्तावाच्या छायांकित प्रती मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, एका तालुक्यात दरवर्षी ५०० फळबाग लाभार्थी असतात व शेततळ्यांसंदर्भात अंदाजे १५० लाभार्थी असतात. अपिलार्थी यांनी सन २००६-२००९ या कालावधीची अशाप्रकारची विस्तृत माहिती मागितली आहे. या सर्व प्रस्तावांची एकूण पृष्ठे अंदाजे २०,००० होतील, असे त्यांनी आयोगास सांगितले. त्याचप्रमाणे फळबाग योजनेसंबंधीची टिपणी, अहवाल व या कालावधीतील शेततळयांच्या लाभार्थ्यांची यादी इ.तपशील अपिलार्थीस दि. १५.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती संकलीत करुन दिली आहे. माहिती संकलीत करण्यास थोडा कालावधी लागला आहे व त्यांच्या कार्यालयात पात्र/अपात्र लाभार्थींचा वेगळा तक्ता तयार करण्याची पध्दत प्रचलीत नसल्यामुळे त्यांच्या कार्यालयात अशी माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते.त्यामुळे त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले होते. अपिलार्थी आजही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस काही कागदपत्रे छायांकित प्रतींच्या स्वरुपात देण्यात आलेली आहेत. ही बाब दिसून येत आहे. तथापि त्यांचे द्वितीय अपील दाखल करण्याच्या कारणांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके,मु.रेल,ता.कन्नड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.कल्याण भरतराव पाटील.रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालय,औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि उपसंचालक,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,औरंगाबाद - श्री. यु.आर.घाटगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या दि. ०४.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०४.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०५-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याण भरतराव पाटील,प्लॉट नं.४५,दत्त कॉलनी,कॉलेज रोड,कन्नड, जि. औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती विजया बंकटराव देशमुख (सौ.माधुरी रविंद्र बोरसे) : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती विजया बंकटराव देशमुख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल-२), कन्नड,जि.औरंगाबाद- श्री. एन.बी.उपाध्ये | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,कन्नड, जि. औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १५.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास दि. १४.०५.२०१० रोजी प्रतिसाद देऊन कळविले आहे की, माहितीकरिता प्रतिपृष्ठ ₹१०/-प्रमाणे ₹८३७/- पृष्ठांकरिता ₹८३७०/- चा भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि.२२.०६.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत असून आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्यात यावी. तदनंतर अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली नाही. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. त्याचप्रमाणे माहितीकरिता प्रतिपृष्ठ ₹२/- ऐवजी प्रतिपृष्ठ ₹१०/-आकारणी करुन शुल्काची रक्कम कळविणे आयोगास योग्य वाटत नाही. या सर्व बाबी विचारात घेता संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत असून भविष्यात याबाबत त्यांनी दक्ष राहावे, असे सूचित करण्यात येत आहे.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सोबत आणली असून ती अपिलार्थीस देऊ शकतात, असे आयोगास सांगितले. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास, जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांत कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी संबंधित माहिती द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

३) अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसात कळवावे व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती द्यावी. ही कार्यवाही तीस दिवसात पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती विजया बंकटराव देशमुख (माधुरी रविंद्र बोरसे),रा.क्रांतीचौक पोलीस कॉलनी,घर नं.११/१०२,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), कन्नड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.संपत भैय्यासाहेब रोडगे, : अपीलकर्ता
रा.रघुनाथनगर,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.संपत भैय्यासाहेब रोडगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद -प्रतिनिधी - श्री.एस.के.चाऊस,तलाठी,तहसील कार्यालय,गंगापूर,जि.औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे व युक्तिवाद यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००३-२०१० पर्यंत गौण खनिजाचा झालेला उपसा व प्राप्त महसूल अशी विस्तृत कालावधीची माहिती मागितली आहे. ही माहिती संकलीत करण्याचे काम चालू असून संकलीत करुन आपणास देण्यात येईल व त्यासंबंधीच्या शुल्काची माहिती कळविण्यात येईल,असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सेवकामार्फत (१३१ पृष्ठे) माहिती पाठविली. याबाबतची पोच दुसऱ्या व्यक्तीने दिल्याचे दिसून येत आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.संपत भैय्यासाहेब रोडगे,रा.रघुनाथनगर,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.नानासाहेब भाऊसाहेब पाटील भवार : अपीलकर्ता
रा.जाखमाथा,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नानासाहेब भाऊसाहेब पाटील भवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, त्यांना आजपावेतो माहिती मिळालेली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटते. यासाठी सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब भाऊसाहेब पा.भवार, रा.जाखमाथा,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.खान कादर,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.खान कादर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यासाठी सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.खान कादर, रा.मुर्गी नाला, मंजुरपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.राजाराम श्रीधर भोंडे,<br>रा.पैठण,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय,जालना<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,जालना | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.राजाराम श्रीधर भोंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन,उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) कार्यालय,जालना - श्री. बी.ए.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,जालना - श्री. मावची एस.एच. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.०४.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत द्वितीय अपिलासंदर्भात यापूर्वी राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठ यांनी दि. १८.११.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय

निर्गमित करण्यासाठी प्रकरण संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे परत पाठविण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर दोनही बाजूतर्फे आयोगासमोर युक्तिवाद करण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्या कार्यालयातर्फे चौकशी झालेली नाही. तसेच आयोगाच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस शुल्काची रक्कम परत करण्याची कृती करण्यात आली आहे.अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, शासनाने रोहयो अंतर्गत झालेल्या गैरप्रकाराबाबत त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी,जालना यांना लिहिलेल्या पत्राचा संदर्भ दिला आहे. त्या पत्रानुसार जिल्हाधिकारी,जालना यांनी केलेल्या चौकशीच्या प्रती व इतर कागदपत्रे त्यांना आवश्यक आहेत. अपिलार्थी यांनी पुढे असेही सांगितले की, आयोगाने आदेश दिलेले नसतानाही दि.१९.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे ₹२२०/- मनीऑर्डरद्वारे त्यांना परत करुन त्यांची दिशाभूल केली, असे त्यांचे मत आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.०४.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये माहिती मागितली आहे. माहितीपोटीचे शुल्क ₹२२०/-भरणा करण्यात यावा असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.०४.२००८ रोजीच्या (मूळ अर्जाच्या दिनांकापासून १३ दिवसांनंतर) पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थी यांनी दि. ०५.०६.२००८ रोजी शुल्काचा भरणा केल्याचे आढळून येत आहे. तदनंतर पुढील १७ दिवसात अधिनियमातील कलम ७(१) नुसार माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते तथापि जन माहिती अधिकारी यांना त्याप्रमाणे देता आली नाही, असे दिसून येते. याकरिता कलम ७(६) अन्वये अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य देय होत आहे. ही बाब विचारात घेता राज्य माहिती आयोगाच्या दि. १८.११.२००९ रोजीच्या आदेशामध्ये माहिती पोटीचे शुल्क ₹२२०/- परत करण्याबाबत आदेश दिसून येत नसले तरी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस शुल्क परत करावे लागले असते. अत: जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी राज्य माहिती आयोगासमोरील दि. १८.११.२००९ रोजीच्या सुनावणी नंतर लगेचच १९.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये शुल्काची रक्कम परत केली आहे, असे दिसून येत आहे. दुसरी बाब म्हणजे अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही ही आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जालना यांनी दि. २९.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याकारणाने अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यासंदर्भात अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्यांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चौकशी करण्यात आली नसेल तर, ही बाब अपिलार्थीस स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कळवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, बालाजी मंदिरामागे,दुर्गावाडी,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पठाण रहेमतउल्ला समीउल्ला, : अपीलकर्ता
पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र
शासन, मंत्रालय, मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ - श्रीमती गीता मोहन चांदे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०८-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोग घेत आहे. जन अपिलीय अधिकारी (अतिरिक्त कार्यभार) उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पठाण रहेमतउल्ला समीउल्ला, पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती उषा मोहन गिरी, | : | अपीलकर्ता |
| | रा. विझोरा, पो. धावडा, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | उप सचिव, कार्यासन आस्था-१, ७ वा मजला, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२<br>- श्री. संतोष तुकाराम घाडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला तेव्हा अपिलार्थीच्या निवृत्ती वेतनाबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती त्यामुळे माहिती देता आली नाही.

उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सुनावणी घेतली किंवा नाही आढळून येत नाही. जन अपिलीय अधिका-याने सदरची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते ती घेण्यात यावी. याकरिता सदरचे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १८-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती उषा मोहन गिरी, रा. विझोरा, पो. धावडा, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
जन अपिलीय अधिकारी तथा
सहसचिव (गृह विभाग),मंत्रालय,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - श्री. यशवंत मुरलीधर बुधवंत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहसचिव(रा.उ.शु.), गृह विभाग मंत्रालय, मुंबई | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,गृह विभाग,मंत्रालय मुंबई यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २४.०२.२०१०

रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये स्नेहल एंटरप्राईजेस,नागपूर यांच्याबाबत एकूण सात मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही सर्व माहिती एका नस्तीमध्ये उपलब्ध आहे. माहिती पुरविण्यासाठीच्या संदर्भात कलम ७(१)नुसार दि. १७.०३.२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे व त्यामध्ये एकूण ३८ पृष्ठांसाठी ₹७६/- व स्पीडपोस्टसाठी खर्च ₹२२५/- असे एकूण ₹३०१/-इतक्या शुल्काची रक्कम लेखाशीर्षाच्या उल्लेखासह भरणा करण्यास कळवून रक्कम भरणा केलेल्या चलनाची प्रत प्राप्त होताच माहिती पाठविण्यात येईल, असे कलम ७(३) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस दि. १७.०३.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. तदनंतर पुन्हा यासंदर्भात अपिलार्थीस दि. ०७.०५.२०१० व दि. २८.०७.२०१० रोजी स्मरणपत्र देण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नसल्याने जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना कोणतेही पत्र मिळाले नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर घेतलेला निर्णय त्यांना प्राप्त झालेला नाही.

आयोगाने विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीचा एक संच उपलब्ध आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. तो संच अपिलार्थीस द्यावा, असे आयोगाने सूचित केले. अपिलार्थीस तो संच देण्यात आला व अपिलार्थी यांनी तो स्वीकारला. अपिलार्थी यांनी त्यांना मिळालेल्या माहितीची पाहणी करावी. त्यामध्ये काही अपूर्ण माहिती आढळून आली तर जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थीस कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भाने विनामूल्य माहिती पुरवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जास अनुसरुन माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे,अरुण ॲटो स्टोअर्स,गांधी पार्क,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव (रा.उ.शु.),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला बु.ता.अंबड,जि.जालना. : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग,मंत्रालय,मुंबई : उत्तरवादी
जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (आस्थापना),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८६ व ६८७ | | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०५-२०११ | |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित | |
| ३.२ | १)जन माहिती अधिकारी - अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. भ.क.गावडे | : | उपस्थित | |
| | २)जन माहिती अधिकारी - अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई-श्रीमती अनुराधा गोखले | : | उपस्थित | |
| ३.३ | १)जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (आस्था.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई- श्री. अतुल कोदे | : | उपस्थित | |
| | २)जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (प्रशा.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री.प.ग.पाटील | : | उपस्थित | |
| | | | अपील क्र.६८६ | अपील क्र.६८७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २१.०७.२०१० | २१.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०४.०८.२०१० | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १२.०९.२०१० | ०५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अपील क्र.६८६ | अपील क्र.६८७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.११.२०१० | १२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी (१) व (२) यांची बाजू ऐकून घेण्यात आली. त्यांनी सादर केलेली कागदपत्रे दाखल करुन घेण्यात आली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १२.०५.२०११ रोजीच्या पत्राद्वारे राज्य माहिती आयोगास विनंती केली की, त्यांच्या द्वितीय अपील अर्जांच्या सुनावणीची पुढील तारीख ठेवण्यात यावी. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्यासाठी सदर दोनही प्रकरणांची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे अन्यथा उपलब्ध कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घेण्यात येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या दोनही द्वितीय अपिलांची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात, रा.पाथरवाला बु.ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(दक्षता), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (आस्था.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबइ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (प्रशा.),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.ए.एम.शेख, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवर सचिव (वि.चौ.),सार्वजनिक बांधकाम मंत्रालय,मुंबई
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसचिव (सेवा),
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.ए.एम.शेख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अवर सचिव (वि.चौ.), सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-प्रतिनिधी - श्री. वि.शि.वर्पे,कक्ष अधिकारी,कार्यासन सेवा-६(अ) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नागनाथ जळकोटे,मुख्य अभियंता,सा.बां.प्रा.वि.पुणे- प्रतिनिधी -श्री.ए.पी.शेटे,प्रमुख लिपीक,सा.बां.प्रा.वि.पुणे-१ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०२.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी सध्या वैयक्तिक रजेवर आहेत. त्यामुळे आज सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी दि. १३.०५.२०११ रोजीच्या निवेदनाद्वारे राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे की, सुनावणीची पुढील तारीख देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर द्वितीय अपील प्रकरणातील त्रयस्थ पक्ष श्री.ना.ह.जळकोटे,मुख्य अभियंता.सा.बां.प्रादेशिक विभाग,पुणे यांनी दि. १६.०५.२०११ रोजीच्या पत्रान्वये खंडपीठाकडील सुनावणीची पुढील तारीख देण्यासाठी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची बाजू तसेच त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अंतरिम आदेश

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए.एम.शेख,संपादक,दै.लोकनेता,घर नं.१-१-५३, कोहिनुर कॉलनी,पानचक्की

रोड,औरंगाबाद

२. त्रयस्थ पक्ष -श्री.ना.ह.जळकोटे,मुख्य अभियंता.सा.बां.प्रादेशिक विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (वि.चौ.), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश सुखदेवराव धनेगांवकर, : अपीलकर्ता
"मैत्रेय", ज्ञानतिर्थ हाऊसिंग सोसायटी, प्लॉट ७/८, सिडको,
एन-८, आदिवासी वस्तीगृहाजवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, चौथा
मजला, विस्तारीत ईमारत, मंत्रालय, मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, चौथा मजला,
विस्तारीत ईमारत, मंत्रालय, मुंबई - ३२

१ अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४

२ सुनावणीची तारीख दि. १८-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. रमेश सुखदेवराव धनेगांवकर : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कक्ष अधिकारी (प्रशा-२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२ - श्री. प्र. पां. लुबाळ

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
सह सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२ - श्रीमती सीमा य. उकार्डे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०३-०७-२००८

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०८-०७-२००८

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०४-०८-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२-०९-२००८<br>फेरसादर दिनांक<br>०१-०९-२००९ |

सदर प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २३-०३-२०१० रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय यांनी राज्य विधान मंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असल्यामुळे सुनावणीस उपस्थित राहणे शक्य होणार नाही असे कळविले होते. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन आज रोजी पुन्हा ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या सेवा कालावधीमधील काही माहिती एकूण चार मुद्दयावर दिनांक ०३-०७-२००८ च्या माहिती अर्जान्वये मागितली आहे. अपिलार्थी हे खाजगी शाळेत कार्यरत होते. या कालावधीची सेवा सेवानिवृत्ती वेतनामध्ये समाविष्ट करण्याकरिताचा प्रस्ताव विचाराधीन होता व ती नस्ती अपिलार्थीने अर्ज केला तेव्हा ग्रामविकास विभागाकडे अभिप्राय व पुढील कार्यवाहीस्तव पाठविली होती त्यामुळे त्यांना माहितीच्या प्रती देण्यास विलंब होत आहे असे दिनांक ०८-०७-२००८ रोजी कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविण्यात आले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २७-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला की, ग्रामविकास विभागाकडे पाठविलेली नस्ती त्यांच्याकडून परत आली नसल्यामुळे सद्यस्थितीत पुढील कार्यवाही करता येत नाही. ग्रामविकास विभागाकडून सदरची नस्ती आल्यानंतर आपणास माहिती देण्यात येईल. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, आज रोजी नस्ती सकारात्मक निर्णय होऊन त्यांच्याकडे परत आली असून अपिलार्थीची त्यांनी खाजगी शाळेत केलेली सेवा शासन सेवेत अंतंर्भूत करुन त्यांचे निवृत्तीवेतन निश्चित करण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, ही बाब त्यांना मान्य असली तरी त्यांना त्यांनी शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडून सादर केलेल्या प्रस्तावाच्या विविध टप्प्यावरच्या तारखा पाहिजे आहेत म्हणजे नेमके विलंब कोठे झाला हे त्यांना अवगत होऊ शकेल.

अपिलार्थी हे जेष्ठ नागरिक आहेत त्यामुळे आयोगाचे असे मत आहे की, त्यांना खालीलप्रमाणे या माहितीच्या प्रती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने एका महिन्याच्या आत द्याव्या लागतील.

१. शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडून शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्रत व त्यावर शालेय शिक्षण विभागाने तयार केलेल्या टिपणीची प्रत ती पुढे ग्रामविकास विभागाकडे पाठविण्यात आली त्या टिपणीची प्रत.

२. पेन्शनबाबत शेवटचे जे आदेश काढले आहेत त्याची प्रत.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १८-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश सुखदेवराव धनेगांवकर, "मैत्रेय", ज्ञानतिर्थ हाऊसिंग सोसायटी, प्लॉट ७/८, सिडको, एन-८, आदिवासी वस्तीगृहाजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (प्रशा-२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जितेंद्र गजेंद्र नरवडे, : अपीलकर्ता
मु. पो. समर्थनगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एन. एम. पवार नायब तहसीलदार (पुरवठा) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दिनांक नमूद नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी कन्नड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानासंबंधी काही माहिती मागितली आहे. त्यांच्या माहितीच्या अर्जावर प्रथमत: दिनांक ११-०२-२०१० रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी सुनावणी घेऊन दिनांक १७-०४-२०१० रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये अपिलार्थीस सात दिवसात विनामूल्य माहिती देण्यात यावी असे नमूद केले आहे. त्याबरहुकूम जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०४-२०१० च्या पत्राने माहिती अपिलार्थीस दिली असून ती अपिलार्थीने व्यक्तिश: घेतली आहे व दिनांक २०-०४-२०१० रोजी त्याची पोच दिली आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जितेंद्र गजेंद्र नरवडे, मु. पो. समर्थनगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरजीत सिंग टी. सहानी, : अपीलकर्ता
रा. ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह दुय्यम निबंधक वर्ग २, औरंगाबाद क्रमांक १ कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह जिल्हा निबंधक वर्ग १, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हरजीत सिंग टी. सहानी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक वर्ग २, औरंगाबाद क्रमांक १ कार्यालय, औरंगाबाद - श्री. एस.बी. खिस्ते | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग १,औरंगाबाद<br>- श्री. जी. बी. कु-हाडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांचा दिनांक १९-११-२००९ चा माहितीचा अर्ज अधीक्षक, भूमि अभिलेख औरंगाबाद यांच्याकडे पाठविला. या अर्जाव्दारे त्यांनी जमिनीचे एकत्रिकरण करण्याबाबत दिलेले हस्तांतरण प्रमाणपत्र गट नंबर १२३, १३९ व १४० सातारा परिसर, तालुका जिल्हा औरंगाबादबाबत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन १९७९ पासून आजपर्यंत असा आहे. जन माहिती अधिका-याने त्यांचा हा अर्ज दिनांक २३-११-२००९ रोजी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांच्याकडे वर्ग केला. त्यावर दिनांक ०५-१२-२००९ रोजी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसून ती दुय्यम निबंधक कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून घ्यावी असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे अपील केले आहे. त्यांनी प्रकरणात सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, प्रकरण दुय्यम निबंधक, औरंगाबादकडे हस्तांतरीत झाले आहे. यावर अपिलार्थी यांनी त्यांना माहिती न मिळाल्यामुळे सह जिल्हा निबंधक वर्ग १, औरंगाबाद यांच्याकडे पुनश्च प्रथम अपील दाखल केले. त्यावर त्यांनी सुनावणी घेऊन अपील मान्य करण्याचा निर्णय दिनांक १३-०७-२०१० रोजी घेतला व अपिलार्थीस पंधरा दिवसात माहिती द्यावी असा निर्णय घेतला. अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग २, औरंगाबाद क्रमांक १ कार्यालय, औरंगाबाद यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी १९७९ पासून माहितीचा संदर्भ दिला आहे. सर्व माहिती अभिलेखे शोधूनही संदर्भिय माहिती त्यांना प्राप्त झ ाली नाही, त्यामुळे अपिलार्थी यांनी नेमकी तारीख किंवा महिना दिल्यास अभिलेखे शोधणे सोईस्कर होईल असे सांगितले. त्यावर अपिलार्थी यांनी मार्च १९७९ हा संदर्भ घेऊन अभिलेखे शोधून घ्यावी अशी विनंती केली. यावर आयोगाने असे सूचित केले की, जानेवारी ते जून १९७९ च्या कालावधीतील अभिलेख्यांचा शोध घेण्यात यावा.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी यांना सह जिल्हा निबंधक वर्ग १, औरंगाबाद यांच्या कार्यालयात जानेवारी १९७९ ते जून १९७९ या कालावधीचे अभिलेखे पाहण्याकरिता दोन दिवस निश्चित करुन (सकाळी ११-०० ते ०५-००) नोंदणीकृत टपालाने कळवून पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्याचप्रमाणे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांच्याकडून मूळ कागदपत्रे हस्तांतरीत झाली असल्यामुळे त्यांच्याही कार्यालयात वर नमूद केल्याप्रमाणे दोन दिवस निश्चित करुन उपलब्ध कागदपत्रे अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील व त्यानंतर अपिलार्थी यांना आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य द्यावी लागतील. तसेच अपिलार्थी यांना जिल्हा सह निबंधक, औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव पाठविल्याचा त्यांचा संदर्भ द्यावा म्हणजे अभिलेखे शोधण्यास सोईचे ठरेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. सह जिल्हा निबंधक वर्ग १, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरजीत सिंग टी. सहानी, रा. ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग २, औरंगाबाद क्रमांक १ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपीलकर्ता
हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद<br>- श्री. अनिलकुमार बस्ते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जून साहेबराव नवपुते, : अपीलकर्ता
रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोध घेऊन उपलब्ध झाली नाही. त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांना दि. १८.०८.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्याची प्रत अपिलार्थीस पोस्टाने पाठविण्यात आली आहे. यासंदर्भातील पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.त्यानंतरही पुन्हा माहितीकरिता शोध घेतला त्यावेळी असे आढळून आले की, श्री.यादव, लेखा लिपीक यांच्याकडे कागदपत्रे उपलब्ध होती व त्यांच्याकडील कार्यभार हस्तांतरणाच्यावेळी हे दिसून आले आहे. परंतु प्रत्यक्षात कार्यभार हस्तांतरण यादी व संचिका तपासून पाहिली असता ही माहिती आढळून आली नाही. त्याचप्रमाणे तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांच्या दि. २३.०७.२०१० रोजीच्या पत्रामध्ये नमूद केले आहे की, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सदरच्या संचिका श्री. यादव, लेखा लिपीक यांच्या ताब्यात होत्या. त्यामुळे संचिकांबाबत संबंधिताबरोबर पत्रव्यवहार करावा. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, सरतेशेवटी नस्ती उपलब्ध होत नाही, असे दि. १८.०८.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) यांना कळविलेले आहे. त्याची प्रत अपिलार्थीस पाठविण्यात आलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन तसेच कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या संचिकेचा शोध घेण्याचे कसोशीने प्रयत्न केले आहेत. तरी संबंधित संचिका मिळाली नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही. ही बाब अपिलार्थीस कळविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वरील सर्व पार्श्वभूमीवर संबंधित संचिका श्री. यादव, लेखा लिपीक यांच्या ताब्यात होती, असे सकृतदर्शनी आढळून येत आहे. त्यामुळे यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.यांना सखोल चौकशी करावी लागेल व संबंधित कर्मचारी/अधिकारी दोषी आढळल्यास पुढील कार्यवाही योजावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे नस्ती गहाळ झाल्याबाबत चौकशी करुन संबंधितावर जबाबदारी निश्चित करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती विठाबाई भिकन देसले, घर नं. १७६ (एम.आय.जी.)म्हाडा, श्रध्दा कॉलनी, जालना रोड, एन-२,सिडको.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, : अपीलकर्ता
प्लॉट क्रमांक ४३, गट क्रमांक ८९, हायकोर्ट कॉलनी
जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, सातारा,
तालुका जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, सातारा,<br>तालुका जिल्हा औरंगाबाद - श्री. ए. एस. गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, औरंगाबाद<br>- श्री. घुगे बी. एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०३-२०१० च्या अर्जान्वये ग्रामपंचायत सातारा, तालुका जिल्हा औरंगाबाद मधील दिनांक १८-०५-२००९ रोजी केलेल्या ठरावानुसार ठरावासंबंधी सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. तथापि त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही दिनांक १८-०५-२००९ रोजी ग्रामसभा झाल्याची नोंद आढळून आली नाही त्यामुळे अपिलार्थीस दिनांक २६-०५-२०१० रोजी तसे कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, दिनांक १८-०५-२००९ रोजी ठराव घेतलेला आहे व त्यासंदर्भात त्यांनी याबाबतची टिपणी ठराव प्रत आयोगास सादर केली. तथापि ही मासिकसभा होती असे आढळून आले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांना दिनांक १८-०५-२००९ रोजी मासिकसभा झाली त्या संदर्भातील उपस्थित केलेल्या मुद्दयावरील माहिती तसेच मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित ग्रामसभा घेण्याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ७ याची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावी असे सुनावणीच्या वेळी ठरले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस मासिकसभेबाबतची व मुद्दा क्रमांक ७ बाबतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, प्लॉट क्रमांक ४३, गट क्रमांक ८९, हायकोर्ट कॉलनी जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, सातारा, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती घौरी यास्मीन बिस्मील्ला खान, : अपीलकर्ता
व्दारा, एम. झेड अहेमद, एस. टी. कंट्रोलर, मोहमदी मस्जीद जवळ, समतानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका, तलत हायस्कूल, बारुदनगर नाला, जुना बाजार, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२१

२ सुनावणीची तारीख दि. २४-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्रीमती घौरी यास्मीन बिस्मील्ला खान : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
मुख्याध्यापिका, तलत हायस्कूल, बारुदनगर नाला, जुना बाजार, औरंगाबाद - श्रीमती खान सुतबुन्नीसा

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. पी. बी. चव्हाण

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २५-०३-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०४-०५-२०१०

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०५-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २५-०३-२०१० रोजीच्या अर्जान्वये शैक्षणिक वर्ष २००९ - १० या कालावधीतील तलत हायस्कूल या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी घेतलेल्या सर्व रजेचे रेकॉर्ड तपशीलासह व हजेरीपटाची सत्यप्रत अशी सविस्तर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षांची माहिती मागितली असल्याकारणाने त्यांच्याकडे कलम ११ खाली विचारणा केली असता त्यांनी सदरची माहिती देण्यास आक्षेप घेतला आहे व ही बाब अपिलार्थीस ०४ मे २०१० रोजी कळविण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०१-०६-२०१० रोजी निर्णय पारीत केला आहे व त्या निर्णया-नुसार अपिलार्थीस दोन आठवड्याच्या आत माहिती विनामूल्य देण्यात यावी असे आदेश निर्गमीत केले आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा रजेचा तपशील व हजेरीपटाच्या सत्यप्रती देण्यात याव्यात अशी त्यांची मागणी आहे असे नमूद केले. अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असल्याकारणाने ही माहिती जाहीर करण्याने कोणते जनहित साध्य होणार आहे याबाबत समर्थन करणे आवश्यक आहे तथापि त्या ते करु शकल्या नाहीत. अपिलार्थी यांनी त्यामुळे हजेरीपटाच्या सत्यप्रती देण्यात याव्यात अशी मागणी केली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग अपिलार्थीची ही बाब मान्य करीत आहे की, अपिलार्थीस हजेरीपटाच्या सत्यप्रती सन २००९ या कालावधीच्या देण्यात याव्यात. त्याबरहुकूम जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीस ही माहिती दिली आहे व अपिलार्थीने ती स्विकारली आहे. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी व पुढील कार्यवाही योजावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती घौरी यास्मीन बिस्मील्ला खान, व्दारा, एम. झेङ अहेमद, एस. टी. कंट्रोलर, मोहमदी मस्जीद जवळ, समतानगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, तलत हायस्कूल, बारुदनगर नाला, जुना बाजार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, : अपीलकर्ता
प्लॉट क्रमांक ४३, गट क्रमांक ८९, हायकोर्ट कॉलनी जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्रीमती ज्योत्स्ना धुळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-०६-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दिनांक १०-०६-२०१० रोजी दिलेल्या निर्णयानुसार अपिलार्थीस संचिकेचे अवलोकन देण्यात आले. अपिलार्थी यांनी संचिकेची पाहणी केली आहे व त्याबाबतची त्याची नोंद केली आहे. सुनावणीच्या वेळी ही बाब अपिलार्थीने मान्य केली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे सुनावणीच्या वेळी ठरले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, प्लॉट क्रमांक ४३, गट क्रमांक ८९, हायकोर्ट कॉलनी जवळ, सातारा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामभाऊ विठ्ठल चिंचोरे, : अपीलकर्ता
रा. गंगापूर (जहागिर), पो. वरुड (काजी),
तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - श्रीमती स्नेहा देव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बि-हाडे एस. एस., विस्तार अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती संबंधित तत्कालीन कनिष्ठ लेखाधिकारी यांच्याकडे होती. मध्यंतरीच्या काळात त्यांना निलंबीत करण्यात आले त्यामुळे ही माहिती उपलब्ध होण्यास कालावधी लागला. आज रोजी त्यांच्याकडे ही माहिती उपलब्ध असून अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असल्याकारणाने त्यांच्या कार्यालयात उपस्थित होण्याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आले होते.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे अपील विहित नमुन्यात सादर न केल्यामुळे दिनांक २६-०७-२०१० रोजी निकाली काढले आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देय होत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत तसेच माहिती देण्यास विलंब झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामभाऊ विठ्ठल चिंचोरे, रा. गंगापूर (जहागिर), पो. वरुड (काजी), तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सलीमोद्दीन अलाउद्दीन,<br>प्लॉट नं. १, एस. टी. कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्व अनुपस्थित आहेत. याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सलीमोद्दीन अलाउद्दीन, प्लॉट नं. १, एस. टी. कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सलीमोद्दीन अलाउद्दीन,<br>प्लॉट नं. १, एस. टी. कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्व अनुपस्थित आहेत. याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सलीमोद्दीन अलाउद्दीन, प्लॉट नं. १, एस. टी. कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उदय अरुणराव पालकर, : अपीलकर्ता
प्लॉट नं. १५, जयश्री हौसिंग सोसायटी, जुन्या मुकूंदवाडी
पोलीस स्टेशन जवळ, मुकूंदवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उदय अरुणराव पालकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - श्री. छानवाल एस. आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - श्री. मोरे जी. डी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०६-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी औरंगाबाद तालुक्याच्या मंडळ कृषि अधिकारी, करमाड यांच्या अंतर्गत मराठवाडा पाणलोट मिशन अंतर्गत एप्रिल २००९ ते मार्च २०१० पर्यंतची माहिती मागितलेली आहे व त्यामध्ये नाला बंडींग, कंटूर बंडींग इत्यादी माहिती, हजेरीपत्रक, मापन पुस्तिका व क्षेत्र मापन पुस्तिका, सर्व प्रकारची मंजूर अंदाजपत्रके इत्यादीच्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने ती एकत्रित करण्यास कालावधी लागला.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही. माहिती उपलब्ध आहे असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी एकंदर २४०० पृष्ठांची उपलब्ध असलेली माहिती आयोगास दाखविली. आयोगाने ती विनामूल्य अपिलार्थीस द्यावी लागेल असे सूचित केले. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे ती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरीत करण्यात आली व अपिलार्थीने ती स्वीकारली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उदय अरुणराव पालकर, प्लॉट नं. १५, जयश्री हौसिंग सोसायटी, जुन्या मुकुंदवाडी

पोलीस स्टेशन जवळ, मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख शब्बीर शेख बाबु, : अपीलकर्ता
रा. स्नेहनगर, सिल्लोड, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घाटनांद्रा,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२७
२ सुनावणीची तारीख दि. २४-०५-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. शेख शब्बीर शेख बाबु : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घाटनांद्रा,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्रीमती वर्षा डोंगरे
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. डी. ए. जायभाये
३.४ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घाटनांद्रा,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. एन. सैवर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २६-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी एकंदर दोन मुद्दयांवर माहिती मागितली आहे आणि त्यापैकी पहिल्या मुद्दयावर त्यांना माहिती मिळाली आहे. मुद्दा क्रमांक दोन मधील जलधारा योजनेबाबतची माहिती अपिलार्थीस, माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्याकारणाने ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यामध्ये प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका व निविदा विषयक कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी. तारीख व वेळ निश्चित करुन अर्जदाराला कळविण्यात यावे व अर्जदारास वरील माहिती निरीक्षणानंतर आवश्यक असल्यास माहितीच्या प्रती द्याव्यात असा निर्णय गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी दिनांक २४-०५-२०१० रोजी घेतला आहे. त्या आदेशामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. तथापि अशा प्रकारची पाहणी अपिलार्थीस देण्यात आली नाही असे दिसून येत आहे. तरी सध्याचे विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सिल्लोड यांना सदरची माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

सध्याचे विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सिल्लोड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सदरची माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख शब्बीर शेख बाबु, रा. स्नेहनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, घाटनांद्रा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमाकांत धोंडोपंत बन्सोड, : अपीलकर्ता
मु. पो. साई भक्ती-निवास, जय योगेश्वर हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं. १७, शिवाजीनगर, पंचायत समितीच्या पाठीमागे,
गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (वि. प्र.)
उपविभाग, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
(पश्चिम), औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२८

२ सुनावणीची तारीख दि. २४-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (वि. प्र.)
उपविभाग, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद
- श्री. टि. ओ. राठोड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
(पश्चिम), औरंगाबाद - श्री. प्रशांत पी. सोनवणे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०२-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी ०१ मार्च २००५ ते ३१ जानेवारी २०१० अशी मोठ्या कालावधीची मोठ्या प्रमाणात विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ती माहिती एकत्र करण्यास काही कालावधी लागला. ती माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली आहे आणि अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती घेतली आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी दिनांक २४-०५-२०११ रोजी राज्य माहिती आयोगास लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली आहे व विचाराधीन व्दितीय अपील ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमाकांत धोंडोपंत बन्सोड, मु. पो. साई भक्ती-निवास, जय योगेश्वर हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १७, शिवाजीनगर, पंचायत समितीच्या पाठीमागे, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम (वि. प्र.) उपविभाग, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिपक भिमराव पवार,<br>रा. एस. टी. कॉलनी, फाजलपुरा, पंचायत समिती जवळ, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दीपक भिमराव पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद<br>- श्री. आर. व्ही. सिरसाळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. मुकीम देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी पहिल्या दोन मुद्दयावरील माहिती मिळाली आहे आणि तिस-या मुद्दयावरील पंचायत समितीकडून रजा राखीव असलेले व पंचायत समितीत कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाची कामकाजाविषयी नोंद असलेली कार्यविवरण वहीच्या पृष्ठांच्या छायांकीत प्रती मिळालेल्या नाहीत. त्याऐवजी त्यांना इनवर्ड आउटवर्ड रजिस्टरच्या २९२४ प्रती देण्यात आलेल्या आहेत व ही माहिती त्यांनी मागितलेल्या माहितीशी सुसंगत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, पंचायत समिती, औरंगाबाद येथे एकच रजा राखीव ग्रामसेवक आहे व त्यांना इनवर्ड आउटवर्डचे काम देण्यात आले होते म्हणून त्याच्या प्रती देण्यात आल्या आहेत. आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी कार्य विवरण नोंदवहीच्या नोंदीची (वर्कशीट) माहिती मागितली आहे. ती अपिलार्थीस देय होत आहे व ती अपिलार्थीस द्यावी लागेल.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी दिलेल्या माहितीमध्ये कार्यविवरण नोंदवहीच्या प्रती आहेत. सन २००१ ते २००९ ची जी माहिती अपिलार्थीस दिलेली आहे त्या कागदपत्रामधून वर्कशीटची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्याप्रमाणे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वर्कशीटची माहिती काढून अपिलार्थीस दाखविली.

या पार्श्वभूमीवर अनावश्यक माहितीचे शुल्क परत करावे लागेल. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रुपये २९३५ इतके शुल्क परत केलेले आहे. त्यामुळे उर्वरीत कागदपत्रे पाहून उर्वरीत शुल्क परत करावे लागेल. अतः अपिलार्थी यांनी या कागदपत्राची पाहणी करावी लागेल व पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना त्याबाबत कळवावे लागेल व जन माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसात उर्वरीत काही शुल्क देय होत असल्यास अपिलार्थीस परत करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कळविल्यस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिपक भिमराव पवार, रा. एस. टी. कॉलनी, फाजलपुरा, पंचायत समिती जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबासाहेब आनंदराव ससाने, : अपीलकर्ता
रा.वडवाळी,ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. डी.एम.लाठकर,कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जि.प.औरंगाबाद - प्रतिनिधी -श्री. बिऱ्हाडे एस.एस.,विस्तार अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन २००६ ते २००९ या कालावधीची 'विशेष घटक', विहिर अनुदान योजनेसंबंधी एकूण १२ मुद्यांद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. त्याकरिता एकूण २३ पृष्ठांसाठी प्रतिपृष्ठ ₹२/- याप्रमाणे ₹४६/- इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे दि. ०४.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे लेखाशीर्षाच्या उल्लेखासह विहित मुदतीत अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी या शुल्काचा भरणा करतील या अंदाजाने दि. १८.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागितलेली माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी दि. ०२.०६.२०१० रोजी ₹४६/- इतक्या शुल्काचा भरणा केला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन वरील बाबीची नोंद घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थीकडून शुल्क घेऊन माहिती पाठविण्यात यावी.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थी यांना काही अपूर्ण माहिती पाठविली आहे, असे वाटत असेल तर अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांत जन माहिती अधिकारी यांना त्यासंदर्भात अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे स्तरावर अपील प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांना संदर्भ केल्यास जन माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबासाहेब आनंदराव ससाने, रा.वडवाळी,ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रेमराज चंद्रभान गुप्ता, : अपीलकर्ता
रा.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
यांत्रिकी विभाग,बीड
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.सं.),नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग,बीड - श्री. पी.आर.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ.सं.),नांदेड - श्री. भा.भ.सरवैया | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दि. ०१.०१.२००८ ते ३१.१२.२००९ या कालावधीतील पैठण तालुका जि.औरंगाबाद यांच्या हद्दीत आपल्या कार्यालयाची वापरण्यात आलेली मशिनरी,वाहने व त्यांनी कि.मी.०० ते कि.मी.७ पर्यंत केलेल्या कामाची एकूण ६ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना दाखविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांची पोच दिली आहे. तथापि असे नमूद केले आहे की, त्यांना या माहितीचा काहीही उपयोग नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी यांचे दि.१७.०८.२०१० रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यात आली आहे.त्यावर अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे कळविल्याने अपील खारीज करण्यात येत आहे.अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही, असे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण आहे, यासंदर्भात कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यांच्या मूळ अर्जासंदर्भाने जन माहिती अधिकारी यांना माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे नेमके कळविल्यास त्यांच्या मूळ अर्जासंदर्भाने माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रेमराज चंद्रभान गुप्ता, रा.गोदावरी हौसिंग सोसायटी,उद्यान रोड, पैठण, ता. पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ.सं.),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कमलाकर विष्णूपंत बाबरेकर, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधिकारी,ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी,ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद,
जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कमलाकर विष्णुपंत बाबरेकर,१३,रघुविरनगर, मारुती मंदिराजवळ,सेंट फ्रान्सिसशाळेसमोर, जालना रोड,औरंगाबाद - ४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चव्हाण कल्याणराव बळवंतराव, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षण उपसंचालक कार्यालय,अमरावती विभाग,अमरावती
जन अपिलीय अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,अमरावती विभाग,अमरावती

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की,अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे.जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती यांनी प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून

घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

विभागीय शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चव्हाण कल्याणराव बळवंतराव,द्वारा एस.बी.चव्हाण, ७३/ब,श्रीकृष्ण नगर, रामतारा सोसायटीरोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,अमरावती विभाग,अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग, अमरावती यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नुरुद्दीन सैफुद्दीन प्रकाशवाला, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद - श्री. एम.ए.जावेदखान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद - डॉ. सी.व्ही. दिवाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कन्झुमर्स फेडरेशन लि.च्या औषधी दुकानाच्या जागेसंदर्भात एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितली आहे, ती दि. १७.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. २५.०५.२०१० रोजी सुनावणी घेतलेली आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात अपिलार्थीस देय असलेली माहिती व दिलेल्या माहितीचा उल्लेख केलेला असून टेलिफोन बुथ/झेरॉक्स दुकानाकरिता प्राप्त झालेल्या अर्जांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात, असे निर्देश दिलेले आहेत. ही माहिती दि. ०७.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नुरुद्दीन सैफुद्दीन प्रकाशवाला,चौक बाजार,फटाका स्टॉलच्या समोर, मिसवॉक डेंटल क्लिनिकच्यावर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भागवत निवृत्ती चव्हाण, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंबड,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भागवत निवृत्ती चव्हाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम अंबड उपविभाग,जि.जालना - श्री. अनिल बेदरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना - प्रतिनिधी - श्री. म. अथहरयोद्दिन शेख,शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी याचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १०.०२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये अंबड उपविभागातील एस.डी.आर. व ३०५४,५०५४,एफ.डी.आर.,४०५५,४५५१ या लेखाशीर्षनिहाय कामाची तसेच त्यांच्या कार्यालयाशी संबंधित इतर मुद्यांवर सविस्तर माहिती दि.०१.०१.२००८ ते ३१.१२.२००९ या कालावधीची मागितली आहे. अपिलार्थी यांना सदरच्या माहितीपोटी रु.२००/- व पोस्टेज रु.५०/- असे एकूण रु.२५०/- शुल्काचा भरणा करण्याबाबत दि.२०.०२.२०१० रोजीच्या पत्राने कळविण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना हे पत्र प्राप्त झाले नाही अन्यथा ते शुल्काचा भरणा करु शकले असते.

या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत मागणी केलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भागवत निवृत्ती चव्हाण,संपादक, साप्ताहिक कृषि सहकारी, प्लॉट नं.१५०, जय विश्वभारती कॉलनी, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम अंबड उपविभाग,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,

जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती सरस्वती मोरे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकुलसचिव (आस्थापना),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सौ. मोहोळ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ५ मे २०१० रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या एकूण ७४ मुद्यांवरील माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी दि. ०४.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली आहे व त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मुद्दा क्र. ८ च्या संदर्भातील माहितीसाठी ₹०६/- चा भरणा केल्यानंतर त्यासंदर्भात छायाप्रती दोन दिवसात पुरविण्यात येतील. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे ८ मे,२०१० रोजी प्रथम अपील केल्याचे आढळून येत आहे. तथापि त्यावर सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. प्रा. सरस्वती मोरे, विद्यापीठ गेटजवळ,जयसिंगपूरा, घ.नं.१-१०-२२, औरंगाबाद - ४३१ ००४

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आस्थापना),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी.बी.सोनवणे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद - श्री. व्ही.जी.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद - श्री. बी.डी.तोडकरी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २४.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२००९ ते ३१.०३.२०१० या कालावधीची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कामकाजाविषयी व त्यांच्या कार्यालयातील उप अभियंते व शाखा अभियंते यांच्या कामकाजाविषयी विविध विषयावर एकूण पाच मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही सर्व माहिती एकत्रित करण्याकरिता काही कालावधी लागला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२२.६.२०१० रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांचे आत माहिती विनामूल्य देण्यात यावी, असा निर्णय घेतला. त्यानंतर दि.०७.०९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास लिहिलेले दि. १०.०५.२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, आता त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील रद्द करण्यात यावे.

या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी.बी.सोनवणे, प्लॉट नं.सी-१९, ४-३५-४०२, गल्ली नं.०६,गजानननगर, गारखेडापरिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम

विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. इंद्रकुमार मोहनलाल गांधी, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख (शहर भूमापन विभाग),
बीड
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक,भूमी अभिलेख कार्यालय,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड - श्रीमती सविता उल्हासराव सोनवणे. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख, बीड- प्रतिनिधी - श्री. एम.आर.बेग,प्रमुख लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध होत नसल्यामुळे त्या माहितीचा शोध घेण्यात येत होता. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली त्यावेळी सुध्दा ही माहिती उपलब्ध झालेली नव्हती. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ०१.०६.२०१० रोजी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, असा निर्णय घेतला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रती काल रोजी (म्हणजेच आजच्या सुनावणीच्या आदल्या दिवशी) त्यांच्या अभिलेखात आढळून आल्या आहेत व त्या ती माहिती अपिलार्थीस आता देऊ शकतात.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या सत्यप्रती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहेत. त्या त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवाव्या लागतील.त्याचप्रमाणे संबंधित नस्तीचा शोध घेण्यासाठी इतका कालावधी का लागला याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख कार्यालय,बीड यांना चौकशी करावी लागेल. चौकशीमध्ये कोणी दोषी आढळल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही योजावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या आता उपलब्ध झालेल्या सत्यप्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

२) जन माहिती अधिकारी यांना संबंधित नस्तीचा शोध घेण्यासाठी इतका कालावधी का लागला याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,बीड यांनी चौकशी करावी. चौकशीमध्ये कोणी दोषी आढळल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इंद्रकुमार मोहनलाल गांधी,भगीरथ इन्क्लेव्ह, फ्लॅट नं. ए-५, खिवंसरा पार्क, विश्वभारती कॉलनी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक ,भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितनवरे पुष्पानंद शंकरराव, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त (मावक), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद- प्रतिनिधी - श्रीमती प्रणाली तायडे, नायब तहसीलदार (मा.व क.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री.आर.एम.साळोक नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, (एकंदर १९४ पृष्ठे) दि. २८.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी दि. २९.०६.२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून ती स्वीकारली आहे व त्याची पोच दिली आहे. ती विभागीय आयुक्त कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना माहिती अपूर्ण दिली आहे, असे मोघम स्वरुपात नमूद केलेले आहे. याकरिता अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत नेमकी कोणत्या मुद्यासंदर्भात अपूर्ण माहिती मिळाली आहे, ही बाब जन माहिती अधिकारी यांना कळवावी लागेल व तदनंतर पुढील पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मूळ अर्जासंदर्भात उर्वरित माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात अपूर्ण माहितीबाबत कळविल्यास तदनंतर पंधरा दिवसांचे आत त्यासंदर्भातील संपूर्ण माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितनवरे पुष्पानंद शंकरराव, जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड.प्रितमकुमार शेगावकर यांच्या बंगल्याशेजारी,लोहीया हॉस्पीटलसमोर,क्रांतीनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (मावक), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपीलकर्ता
मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे वारंवार आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थित राहतात याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही व प्रकरणात निर्णय झालेला नाही. अपिलार्थी यांच्या दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर,<br>मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे वारंवार आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थित राहतात याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही व प्रकरणात निर्णय झालेला नाही. अपिलार्थी यांच्या दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर,<br>मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे वारंवार आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थित राहतात याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही व प्रकरणात निर्णय झालेला नाही. अपिलार्थी यांच्या दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बी. बी. सोनवणे,<br>प्लॉट नं. सी-१९, ४-३५-४०२, गल्ली ०६, गजानन नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. आर. बी. जाधव, उपलेखापाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता रुपये ७०८ इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०५-२०१० रोजीच्या पत्राने कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दिनांक ३०-०६-२०१० रोजी निर्णय दिला आहे. त्यामध्ये ही बाब विचारात घेतली आहे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्क भरल्यावर माहिती पुरवावी असे आदेश देऊन अपील नामंजूर केले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १३-०७-२०१० रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी ३५४ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस त्याच दिवशी दिलेली आहे. अपिलार्थी यांचे दिनांक ०७-०५-२०११ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे व विचाराधीन व्दितीय अपील त्यामुळे निकाली काढण्यात यावे. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. बी. सोनवणे, प्लॉट नं. सी-१९, ४-३५-४०२, गल्ली ०६, गजानन नगर,

गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (म.ग्रा.रो.ह.यो. विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सत्तार खान पिता खाजा खान, | : | अपीलकर्ता |
| | रा. घर क्रमांक ५/२४/६२, खोकडपुरा, औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, क्रांती चौक, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी, | : | |
| | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, गजानन मंदिर रोड, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सत्तार खान पिता खाजा खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, क्रांती चौक, औरंगाबाद | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, | : | अनुपस्थित |
| | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, गजानन मंदिर रोड, औरंगाबाद | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे. तथापि त्यामध्ये ॲग्रीमेंटची प्रत मिळाली नाही ती चुकीची देण्यात आलेली आहे. त्याकरिता मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गारखेडा, औरंगाबाद यांना या बाबी व्यक्तिशः पहाव्या लागतील. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला दिलेली लीज ॲग्रीमेंट योग्य आहे किंवा कसे याची छाननी करावी लागेल व त्यानुसार ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पुरवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सत्तार खान पिता खाजा खान, रा. घर क्रमांक ५/२४/६२, खोकडपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, क्रांती चौक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, गजानन मंदिर रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गारखेडा, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गफार खान पिता खाजा खान, : अपीलकर्ता
रा. भारत सर्व्हिसिंग सेंटर, हॉटेल राज समोर, जालना रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, तलाठी कार्यालय, भावसिंगपुरा, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गफार खान पिता खाजा खान | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, तलाठी कार्यालय, भावसिंगपुरा, औरंगाबाद<br>- श्री. ए. व्ही. निळेकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद - प्रतिनिधी<br>- श्री. एम. एल. पवार, नायब तहसीलदार (महसूल) | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी बनेवाडी शिवार गट नंबर २४ बद्दल गट नंबर २४ मधील चार एकर चार गुंठे मध्ये श्री. महंमद कमालोद्दीन, महंमद अजमखान, फकरुनीसा बेगम, ताहेरा बेगम व समीरा बेगम यांची नावे ७/१२ उता-यावर कोणत्या आधारे फेरफार करुन दिली आहेत याची माहिती कागदपत्रासह मागितली आहे त्याचप्रमाणे अर्जासोबत त्यांनी ७/१२ संदर्भासाठी जोडला आहे तथापि त्यांना आजपर्यंत माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्याकडील अभिलेखात याची पाहणी केली तथापि त्यांना ही माहिती आढळून आली नाही. अपिलार्थी यांनी नेमके वर्ष नमूद केले नसल्यामुळे ही माहिती अभिलेख्यातून शोधून काढणे शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर आयोगाने विचारणा केली असता अपिलार्थी यांनी सदरचा फेरफार २००३ या सालात झाला आहे असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांना याची पुनश्च पडताळणी करुन अपिलार्थीने मागितलेल्या प्रती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गफार खान पिता खाजा खान, रा. भारत सर्व्हिसिंग सेंटर, हॉटेल राज समोर, जालना रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे,<br>तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल समोर, उल्कानगरी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. वसंत मा. निकम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. डी. पी. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी केलेल्या दिनांक १२-०१-२०१० च्या निवेदनावर केलेली कार्यवाही व चौकशीचा अहवाल त्याचप्रमाणे दिनांक ०८-०१-२०१० रोजीच्या आमदार यांच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक १०-०५-२०१० रोजी माहिती देण्यात आली असून त्याकरिता रुपये चारचा भरणा महानगरपालिका कार्यालयात करण्याचे कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे मा. न्यायालयाने या प्रकरणाबाबत घेतलेला निर्णयही अपिलार्थीस कळविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०३-०७-२०१० रोजीच्या पत्राने माहिती पाठविण्यात आली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आयोगास दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल समोर, उल्कानगरी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अर्जून साहेबराव नवपुते, : अपीलकर्ता
रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. एम. एल. पवार, नायब तहसीलदार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. एस. आर. बु-हाडे, अ. का. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जून साहेबराव नवपुते, रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामकृष्ण किसनराव आटुळे, : अपीलकर्ता
बी-१/३, सुमंगल विहार, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
मिलींद कॉलेजसमोर, छावणी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
मिलींद कॉलेजसमोर, छावणी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामकृष्ण किसनराव आटुळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, कार्यालय, अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मिलींद कॉलेजसमोर, छावणी, औरंगाबाद - श्री. पाटील महादेव सोपान | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मिलींद कॉलेजसमोर, छावणी, औरंगाबाद<br>- सौ. एस.बी. नरवाडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे तथापि ती माहिती अपूर्ण आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी सर्व माहिती दिली आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकृष्ण किसनराव आटुळे, बी-१/३, सुमंगल विहार, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, कार्यालय, अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मिलींद कॉलेजसमोर, छावणी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मिलींद कॉलेजसमोर, छावणी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. विशाल जगन्नाथ शेळके,<br>मु. पो. पारळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर,<br>तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६४९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. टी. बी. मांडवडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर,<br>तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. एस. डी. चव्हाण | : उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. एस. आर. पवार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०५-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे दिनांक ३०-०४-२०१० रोजी ग्रामपंचायत पारळा कार्यालयात तहसीलदार, वैजापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेबाबतची माहिती मागितली आहे. सदरची सभा झाल्या-नंतर संबंधित रजिस्टर त्यांच्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयात होते त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता येऊ शकली नाही. आता सदरचे रजिस्टर ग्रामपंचायतीकडे परत प्राप्त झाले आहे त्यामुळे सध्याचे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ही माहिती देऊ शकतील. या बाबी विचारात घेता सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विशाल जगन्नाथ शेळके, मु. पो. पारळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पारळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, : अपीलकर्ता
रा.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर,जि.औरंगाबाद -श्री. सी.एम.सराफ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद - श्री.डी.एम.पालोदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास त्रिंबकराव भालेराव,रा.नृसिंह कॉलनी,गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश सांडुजी हिवराळे, | : | अपीलकर्ता |
| रा. औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेश सांडुजी हिवराळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक - श्री. ज.रा.सोनार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक - श्री. म.गु.राघोर्ते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.०५.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी एकूण ७ मुद्यांपैकी १ ते ३ मुद्याशी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे या माहितीपोटी शुल्क ₹४४/- कार्यालयात भरण्यात यावे, असे अपिलार्थीस दि. २०.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. उर्वरित मुद्यांशी संबंधित माहितीसाठी अपिलार्थीचा अर्ज दि. २०.०५.२०१० रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यासाठी दोन वेळा अपिलार्थीस बोलावण्यात आले. तथापि अपिलार्थी अनुपस्थित राहिल्यामुळे सुनावणी घेता आली नाही. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी युक्तिवादात सांगितले की, रु.४४/- भरणा करावा, हे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी क्र.(१) तथा सहायक प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास आयुक्तालय,नाशिक यांना त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ ते ६ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी क्र.(२) तथा सहायक प्रकल्प अधिकारी, कार्यालय अपर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी क्र.(१) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती व जन माहिती अधिकारी क्र.(२ )यांनी मुद्दा क्र.२ ते ६ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश सांडुजी हिवराळे, द्वारा सोनवणे बी.व्ही.(वनपाल),घर क्र. २६१, मिलींदनगर,उस्मानपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, कार्यालय अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जी. एन. शेख,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्रमांक १, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर मंडळ कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जी. एन. शेख | : | उपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्रमांक १, औरंगाबाद- श्री. एस.एल.साळवे,सध्या मराविविकंलि मालेगाव विभाग | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्रमांक १, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर मंडळ कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी अवगत केले की, त्यांना पाच महिन्यांनंतर अपूर्ण माहिती मिळाली आहे. त्यामुळे त्यांचे नुकसान झालेले आहे. त्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

या प्रकरणात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जी. एन. शेख, द्वारा श्री. अब्दुल गनी खान,घर क्र. १-९-४१, डॉ. कादरी यांच्या घराजवळ,जयसिंगपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कादर खान,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग क्रमांक १, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कादर खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग क्रमांक १, औरंगाबाद - श्री. प्र.सि.सरकटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद - श्री. ए.वाय.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा अर्ज मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग,औरंगाबाद यांच्याकडे केलेला आहे. तो अर्ज दि.१७.०५.२०१० रोजी मंडळ कार्यालयास पाठविण्यात आला. त्यानुसार अपिलार्थीस दि. २६.०५.२०१० रोजी मंडळ कार्यालयाकडून माहिती देण्यात आली. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी दि.२०.०७.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, विभागामध्ये उपलब्ध असलेली माहिती विभागीय कार्यालयाकडून परस्पर संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी व सदर अपील निकाली काढले. या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे एकंदर २५ पृष्ठांची माहिती उपलब्ध असल्याचे सांगितले. आयोगाच्या सूचनेनुसार ती माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थीस आयोगातर्फे सूचित करण्यात आले की, त्यांनी प्रथम या माहितीची पाहणी करावी व त्यामध्ये काही माहिती अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांना मिळालेल्या माहितीसंदर्भात काही त्रुटी कळविल्यास त्यासंदर्भात पुढील पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कादरखान,(युवा शासन) मंजुरपुरा,मुर्गीनाला,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आबासाहेब मोहनराव लंगडे,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ब्राम्हणगाव,ता.पैठण,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आबासाहेब मोहनराव लंगडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत ब्राम्हणगाव,ता.पैठण, जि.औरंगाबाद - श्री. शेख एम.एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पं.), पंचायत समिती,पैठण,जि. औरंगाबाद- श्री. डी.टी.भिसे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे व या दोन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस दि. १६.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे पाठविली आहे. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. तथापि ती माहिती त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपेक्षा विपरीत आहे. त्यांना खालील दोन मुद्यांवरील माहितीची आवश्यकता आहे.

१) प्लॉट क्र. १७५ सध्याचा आहे त्याचा पूर्वीचा क्रमांक देण्यात यावा.

२) ग्रामपंचायत मालमत्ता क्र.१७५ मधील मालकीहक्कात साधारणपणे सन २००० मध्ये फेरफार झालेला आहे. तो ज्या आधारे झाला आहे त्या कागदपत्रांच्या प्रती.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, ग्रामपंचायत, ब्राम्हणगावची स्थापना झाल्यानंतर ज्यावेळी असेसमेंट झाले, त्या २००० च्या असेसमेंटप्रमाणे सदर मिळकतीचा क्रमांक १७५ असा झाला आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, १७५ या मालमत्ता क्रमांकाचा समावेश पूर्वीच्या १६२ मध्ये आहे व मालमत्ता क्र.१६२ चे विभाजन होऊन १७५, १७६, १७७ व १७८ असे चार हिस्से झालेले आहेत. यामुळे या प्रक्रियेत तयार झालेली सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागतील. यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दोन दिवस निश्चित करुन (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आबासाहेब मोहनराव लंगडे, दिपनगर,हडको, एन-११,सी-१,१६/५,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत ब्राम्हणगाव,ता.पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पं.), पंचायत समिती,पैठण,जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नाथाभाऊ नामदेव पाटील गाडेकर, : अपीलकर्ता
रा. जांभळी,पो.निलजगाव, ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य
केंद्र,बनोटी,ता.सोयगाव,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र,बनोटी,ता.सोयगाव,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.औरंगाबाद - डॉ.विखे पाटील | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष- श्री. गोदे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी चार मुद्यांची माहिती अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी दि.१०.०८.२०१० रोजी प्रत्यक्ष देण्यात आली व उर्वरित मुद्दा क्र. २ व ६ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थी यांना तात्काळ देण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी यांना निर्णयाद्वारे सूचित केले.जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अपिलार्थीस दिली आहे, असे त्यांच्या कार्यालयाकडून समजले आहे.तथापि सुनावणीच्यावेळी त्याबाबतचा पुरावा सादर करु शकले नाहीत.याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नाथाभाऊ नामदेव पाटील गाडेकर, मु.जांभळी,पोस्ट निलजगाव, ता.पैठण, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र,बनोटी, ता. सोयगाव, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नाथाभाऊ नामदेव पाटील गाडेकर : अपीलकर्ता
मु. जांभळी,पोस्ट निलजगाव,ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अति.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद -प्रतिनिधी - डॉ.एम.आर.कराड, प्रशासन अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.औरंगाबाद - डॉ.विखे पाटील | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री.गोदे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १०.०६.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्रथम दि.०३.०७.२०१० रोजी विहित मुदतीत दिलेली आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १०.०८.२०१० रोजी निर्णय दिलेला आहे की, अपिलार्थीस आवश्यक असलेली उर्वरित माहिती आठ दिवसाच्या आत देण्यात यावी. त्याप्रमाणे दि. ३०.०८.२०१० रोजी संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नाथाभाऊ नामदेव पाटील गाडेकर, मु.जांभळी,पोस्ट निलजगाव, ता.पैठण, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. किरण निवृत्ती शिंदे,<br>रा. पैठण,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद - श्री. जी. डी. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, जि. औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. व्यास,लघुलेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २१.०५.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मौजे पैठण येथील सर्व्हे नं. ३ व ४ मधील प्लॉट क्र. ४७ ची नक्कल मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, सदरची माहिती अपिलार्थीस ते देऊ शकले नाहीत कारण की, त्यांच्या तहसील कार्यालयास सन २००० मध्ये आकस्मिक आग लागली होती व त्यांचे कार्यालय दोन वेळा स्थलांतरित केले आहे.त्यांनी संबंधित संचिकेचा शोध घेऊनही मिळाली नाही. ही बाब अपिलार्थीस कळविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. ०६.०७.२०१० रोजी निर्णय दिला आहे की,अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस सात दिवसाचे आत विनामूल्य देण्यात यावी व माहिती देण्यासाठी उशिर झाल्यास त्याची सर्व जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची राहील. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अजूनही माहिती उपलब्ध झाली नाही व होऊ शकत नाही. यावर आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली की, अशाप्रकारच्या दस्तऐवजाच्या प्रती इतर कोणत्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील काय, यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध होऊ शकतात. याकरिता प्रकरण आता उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांना पाहावे लागेल व अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.त्यादृष्टीने तहसीलदार यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांची सदरची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन अपिलार्थीस देण्यास मदत करावयाची जबाबदारी राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

या द्वितीय अपील प्रकरणात वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाने निश्चित केलेल्या जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी व नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,पैठण यांनी त्यांना मदत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०५-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण निवृत्ती शिंदे, रा.यशवंतनगर,कोर्टासमोर, पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(महसूल-१),तहसील कार्यालय, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण निवृत्ती शिंदे,<br>रा. पैठण,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), पैठण,जि.औरंगाबाद - श्री. जी. डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. व्यास,लघुलेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की,अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २१.०५.२०१० रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जान्वये सन १९८२ ते ८५ दरम्यान मौ. पैठण स.नं. ५१ ही जमीन धरणग्रस्त म्हणून मिळालेल्या जमिनीच्या कागदपत्राची नक्कल मागितलेली आहे. परंतु तहसीलदार कार्यालय,पैठण कार्यालयास सन २००० मध्ये आकस्मिक आग लागल्यामुळे व दोन वेळा स्थलांतर झाल्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊनही मिळू शकले नाहीत, असे दि.१९.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविलेले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०७.२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्यात यावी व त्याची जबाबदारी तहसीलदार,पैठण यांची राहील.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,पैठण यांनी आयोगास अवगत केले की, संबंधित अभिलेखांचा शोध घेऊन कागदपत्र उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता येऊ शकत नाही. यावर आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली की, अशाप्रकारच्या दस्तऐवजाच्या प्रती इतर कोणत्याही कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील काय, यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध होऊ शकतात. याकरिता प्रकरण आता उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांना पहावे लागेल व अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.त्यादृष्टीने तहसीलदार यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांची सदरची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन अपिलार्थीस देण्यास मदत करावयाची जबाबदारी राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

या द्वितीय अपील प्रकरणात वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाने निश्चित केलेल्या जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी व नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,पैठण यांनी त्यांना मदत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण निवृत्ती शिंदे, रा.यशवंतनगर,कोर्टासमोर, पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१),तहसील कार्यालय, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पैठण,जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळू भास्कर बनसोडे, : अपीलकर्ता
रा. जामगाव,ता. गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत
समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाळू भास्कर बनसोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. ए.जे. भालेराव, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री.एस.एस.बिऱ्हाडे, विस्तार अधिकारी (सां.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे गंगापूर तालुक्यातील इंदिरा आवास घरकुल वाटप योजनेअंतर्गत सन २००० ते २०१० या दहा वर्षाची चार मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे, परंतु ती माहिती त्यांना आतापर्यंत मिळाली नाही. यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगास दिलेल्या अधिकारानुसार दंड लावण्यात यावा व त्यांना माहिती देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या यादीमध्ये ८ लाभार्थींचा समावेश आहे. आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध आहे. ते ती यादी अपिलार्थीस देऊ शकतात.ती माहिती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आली. ती अपिलार्थी यांनी स्वीकारली.जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की,या प्रकरणाशी संबंधित गट विकास अधिकारी व इतर अकरा कर्मचारी निलंबित झाले असून चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. या सर्व बाबीमुळे, आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. २६.०४.२०१० रोजीचा आहे. आज रोजी जी माहिती उपलब्ध होत आहे ती माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस देण्याची जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर जबाबदारी होती. तथापि आज रोजी ती माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे त्यांच्याकडून अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झाल्याचे स्पष्ट होत आहे. यास्तव अधिनियमातील कलम २० (१) नुसार जन माहिती अधिकारी व संबंधित कर्मचारी यांना एकत्रित ₹२५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांची राहील.

अपिलार्थीस आज रोजी जी माहिती प्राप्त झाली, त्या माहितीची त्यांनी प्रथम पाहणी करावी व त्यामध्ये काही त्रुटी आढळली तर पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. तदनंतर पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

३) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास तदनंतर पंधरा दिवसांचे आत उर्वरित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

४) जन माहिती अधिकारी व त्यांचे यासंदर्भातील सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिली नसल्याचे दिसून आल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व कर्मचारी यांना एकत्रित ₹२५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळू भास्कर बनसोडे, रा. जामगाव,पो.रघुनाथनगर,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ए.ए.जोशी, रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| महावितरण, औरंगाबाद परिमंडळ, विद्युत भवन,औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्य अभियंता,महावितरण, ग्रामीण मंडळ,विद्युत भवन,औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महावितरण औरंगाबाद परिमंडळ,विद्युत भवन,औरंगाबाद - श्री. अरविंद गावरस्कर | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, महावितरण,औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद - श्री. किशोर शिरसीकर | : | उपस्थित |
| ३.४ | विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महावितरण, ग्रामीण प्रविभाग, औरंगाबाद - श्री. अ. म. नितनवरे | : | उपस्थित |
| ३.५ | विद्यमान जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (ग्रा.), महावितरण,औरंगाबाद - श्री. एस.एन.पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए.ए.जोशी, प्लॉट क्र.२१, गुरुकृपा हौसिंग सोसायटी चाणक्यपुरीसमोर, शहानुरवाडी, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महावितरण ग्रामीण प्रविभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (ग्रा.), महावितरण, विद्युतभवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खय्युमखान पिता पिरखान, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,अमीन प्राथमिक शाळा (ऊर्दू),औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री.एम. रफिक शेख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,अमीन प्राथमिक शाळा (ऊर्दू),औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खय्युमखान पिता पिरखान, गल्ली नं.७(ए), संजयनगर, बायजीपुरा, पोलीसचौकीजवळ औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,अमीन प्राथमिक शाळा (ऊर्दू),आसेफिया कॉलनी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती मंदाकिनी शुभकरण धानुका,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती मंदाकिनी शुभकरण धानुका | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक प्रशासन, तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर,जि.उस्मानाबाद - श्री. दिलीप दे.नाईकवाडी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की,अपिलार्थी यांनी तुळजाभवानी मंदिरासंदर्भात दि. २५.१२.२००९ ते ३१.१२.२००९ पर्यंत तुळजाभवानी मंदिरामध्ये दर्शनासाठी आलेल्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती व अपंग व्यक्तींची संख्या, नावे व त्यांच्या पदाची माहिती दोन मुद्याद्वारे मागितली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१) दि. २५.१२.२००९ ते ३१.१२.२००९ या कालावधीत अतिमहत्त्वाच्या व अपंग व्यक्तींची संख्या

२) या कालावधीमध्ये गुलाबी रिबीन किती महत्त्वाच्या व अपंग व्यक्तींना देण्यात आल्या आहेत, त्यांचे नाव व पत्ता.

ही माहिती अपिलार्थीस देण्यात आली नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती आज रोजी सोबत आणली आहे. ती अपिलार्थीस देऊ शकतात. यामध्ये त्यांच्याकडे दि.२७.१२.२००९ ते ३१.१२.२००९ पर्यंतची माहिती उपलब्ध आहे. कारण ही योजना दि. २७.१२.२००९ पासून सुरु केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेल्या संबंधित रजिस्टरच्या पृष्ठांच्या दोन झेरॉक्स प्रती आयोगाच्या कार्यालयात काढण्यात आल्या व अपिलार्थी यांना आज रोजी देण्यात आल्या. यावर अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती मंदाकिनी शुभकरण धानुका, महिला अध्यक्षा, माहिती सेवा समिती, द्वारा ॲड.

एस.एम.धानुका, सिटी चौक पोलीस स्टेशन मागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक प्रशासन, तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी,<br>रा. पैठण,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद - श्री. जी. डी. सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पैठण,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष- श्री. मोहन कचरु त्रिभुवन | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०८.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.११.२००९

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०६.०४.२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन प्रकरणात आज रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. सध्याचे जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की,अपिलार्थी यांनी दि. २७.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ व्यक्तीसंदर्भात बारा मुद्यांद्वारे माहिती मागितलेली आहे. त्यासंदर्भात अपिलार्थीस दि. १५.०७.२००९ रोजी शुल्क ₹६८/- चा भरणा कार्यालयात करण्यात यावा, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. १८.०८.२००९ रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थीस काही माहिती प्राप्त झाली आहे, असे दिसून आले आहे. त्यामुळे उर्वरित माहितीचा शोध घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचा निर्णय घेतला.या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते.आज रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगास सांगितले की, माहितीचा शोध घेऊनही उर्वरित माहिती प्राप्त झाली नाही. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, संबंधित कार्यालयातील महत्त्वाचे अभिलेखे सन २००० मध्ये आगीच्या दुर्घटनेमध्ये नष्ट झाले आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस उपलब्ध माहिती पुरविण्यात आली असून उर्वरित माहिती पुरविण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २६-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी,ह.मु.रंगारहाटी,काळापहाडजवळ,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सत्तारखान पिता खाजाखान, : अपीलकर्ता
रा. घर क्रमांक ५/२४/६२, खोकडपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६७९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सत्तारखान पिता खाजाखान व मदतनीस श्री. मो. रफिक | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी-२, महानगरपालिका, औरंगाबाद - श्रीमती अलका खैरे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. संतोष महादेव खांडेकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे मदनीस, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२०१० रोजीच्या अर्जाव्दारे सर्व्हे नंबर ५७, सि. स. नं. १३१६३ जालना रोड, औरंगाबाद बाबत तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे आणि ही माहिती दिनांक ०७-०६-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस देण्यात आली आहे व ती अपिलार्थीस दिनांक १०-०६-२०१० रोजी मिळाली आहे. याबाबत अपिलार्थीने पोच दिली आहे ती त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली आहे तथापि त्यांना न्यायालयाची प्रत मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांना न्यायालयाची प्रत अपिलार्थी द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सत्तारखान पिता खाजाखान, रा. घर क्रमांक ५/२४/६२, खोकडपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी-२, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उदय अरुणराव पालकर, : अपीलकर्ता
प्लॉट नं. १५, जयश्री हौसिंग सोसायटी, जुन्या मुकूंदवाडी
पोलीस स्टेशन जवळ, मुकूंदवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>औरंगाबाद - श्री. एस. एम. मांगुळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>औरंगाबाद - श्री. एच. एस. पगारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-०६-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २००८ ते २०१० या कालावधीची बांधकामाबाबत एकूण आठ मुद्दयावर माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२०१० रोजीच्या पत्राने नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली आहे. पोच त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तथापि अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना मिळालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे म्हणून प्रथम अपील सादर केले आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक २३-०८-२०१० रोजी सुनावणी घेतली त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी हजर होते. जन अपिलीय अधिकारी यांनी संपूर्ण बाबीचा विचार करुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिलेली आहे या निष्कर्षाप्रत येऊन प्रकरण निकाली काढले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उदय अरुणराव पालकर, प्लॉट नं. १५, जयश्री हौसिंग सोसायटी, जुन्या मुकूंदवाडी पोलीस स्टेशन जवळ, मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहंमद अब्दुल मुजीब,<br>घर नं. १-१५-५०, नेहरु भवनच्या बाजूला, बुढी लेन, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहंमद अब्दुल मुजीब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. अ. तु. नवटके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. जी. एस. खाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती मिळाली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. जी माहिती अपूर्ण मिळाली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक ३ मधील स्टॉक लेजरच्या प्रती मिळाल्या नाहीत.

२. मुद्दा क्रमांक ४ मधील फॉर्म नंबर ९० ची माहिती मिळाली नाही.

३. मुद्दा क्रमांक ५ मधील फॉर्म नंबर ८७ ची माहिती मिळाली नाही.

४. फॉर्म नंबर ५८ ची प्रत मिळाली नाही.

५. फॉर्म नंबर ५९ ची प्रत मिळाली नाही.

६. फॉर्म नंबर ४६ व ४७ गेटपासेसच्या प्रती मिळाल्या नाहीत.

ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. जी माहिती उपलब्ध नाही त्याबद्दल स्पष्ट अपिलार्थीस कळवावे लागेल. अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाल्याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास विहित मुदतीत माहिती दिली जाईल यासाठी जन माहिती अधिकारी यांना दक्ष राहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अब्दुल मुजीब, घर नं. १-१५-५०, नेहरु भवनच्या बाजूला, बुढी लेन, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र ममराज चव्हाण, : अपीलकर्ता
रा. हनुमतंखेडा, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव,
तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६८२

२ सुनावणीची तारीख दि. २७-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव,
तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. जी. व्ही. नरवडे, नायब तहसीलदार (महसूल)

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

३.४ श्री. साळवे डी. जे. तलाठी, हनुमतखेडा : उपस्थित

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व श्री. साळवे डी. जे. तलाठी, हनुमतखेडा, तालुका सोयगांव उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये श्री. साळवे, तलाठी यांच्याबाबत ते नियुक्त झाल्यापासून आतापर्यंत किती फेरफार केले आहे व ते कशाच्या आधारे याची दिनांकासहीत अशी विस्तृत माहिती मागितली आहे. सदरची माहिती नेमकी कोणत्या गावाची किंवा संपूर्ण कालावधीची किंवा बनोटी येथे नियुक्ती झाल्यापासूनची याबाबतचा खुलासा नाही. त्यामुळे मागितलेल्या माहितीचा बोध होत नसल्याकारणाने कोणती माहिती द्यावी संभ्रम निर्माण झाला. याकरिता स्पष्ट खुलासा करावा असे दिनांक २६-०३-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले. यानंतर पुन्हा दिनांक १५-०५-२०१० रोजी तत्कालीन तलाठी श्री. साळवे यांना तहसीलदार, सोयगांव यांनी कळविले की, आपण बनोटी सजास नियुक्त झाल्यापासून आजपर्यंत माहिती द्यावी व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. सदरची माहिती उपलब्ध आहे. तथापि अपिलार्थी माहिती घेण्यास इन्कार करत आहेत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व याबाबतचा पंचनामा त्यांच्या दप्तर दाखल आहे. त्याप्रमाणे तलाठी सजा बनोटी यांनी अपिलार्थीस तहसीलदार, सोयगाव यांनी वर नमूद केलेली बनोटी सजाची त्या कालावधीची माहिती तयार असून एकूण १५० पेजेसकरिता रुपये दोन प्रमाणे रुपये ३०० चा भरणा करावा असे दिनांक २६-०५-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले, तथापि त्यावर अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी माहिती घेत नसल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि अपिलार्थीने माहिती घेतली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांना माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस पाठवावी लागेल.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र ममराज चव्हाण, रा. हनुमतंखेडा, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सचिव, : अपीलकर्ता

श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित,
लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी

सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६४

२ सुनावणीची तारीख दि. २७-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - सचिव, : अनुपस्थित

श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित,
लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

३.२ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद

- श्री. व्ही. व्ही. धोटे

४ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ३०-०६-२००९

५ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०९-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली

होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे तथापि आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या प्रकरणात श्री.काशिनाथ विश्वनाथ गजबारे यांनी श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबादबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव यांनी माहिती देण्याचे नाकारले त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती देय होत आहे असा निर्णय दिला आणि या निर्णयावर त्या माहिती अर्जातील जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे प्रथम अपिलाच्या निर्णयाबाबत अपील केले आहे. त्यांना या प्रकरणात अपिलार्थी संबोधण्यात येत आहे. सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती तथापि आज रोजी देखील ते उपस्थित नाहीत. त्यांना पुन्हा एक संधी देण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी (सचिव) अनुपस्थित राहिले तर आयोगापुढे होणारा युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन वस्तुनिष्ठ निर्णय घेण्यात येईल याची नोंद अपिलार्थी - सचिव श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांनी घ्यावी. या पार्श्वभूमीवर सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्यव्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुंडे रमेश शहाजी, : अपीलकर्ता
संभाजी नगर, उस्मानाबाद, व्दारा मंथन लॉ अकॅडमी, मराठा सेवासंघ कार्यालय, नाईकवाडी प्लॉट, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद - सौ. सुमन मोरे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. हिराचंद कराळे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-११-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक २२-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २५-०५-२०११ रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे. अपिलार्थीने माहिती मिळाल्याबाबतची पोच दिली आहे असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुंडे रमेश शहाजी, संभाजी नगर, उस्मानाबाद, व्दारा मंथन लॉ अॅकडमी, मराठा सेवासंघ कार्यालय, नाईकवाडी प्लॉट, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद, : अपीलकर्ता
७७१, मजीद व्हिला, रसुलपुरा, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टॅण्ड जवळ, सिडको, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टॅण्ड जवळ, सिडको, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ सांख्यिक अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टॅण्ड जवळ, सिडको, औरंगाबाद<br>- श्री. एच. एन. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टॅण्ड जवळ, सिडको, औरंगाबाद<br>- श्री. आर. एम. पवणीकर | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. निमसरकार | : | अनुपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. अय्यर यु. एस. | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-१२-२००९ मुंबई कार्यालयाकडे प्राप्त<br>०२-०१-२०१० औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक २२-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. निमसरकार हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष श्री. अय्यर उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये एकुण नऊ मुद्दयावर मोठ्या व्याप्तीची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती एकत्र करण्यासाठी त्यांना काही कालावधी लागला व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती तसेच जी वैयक्तीक स्वरुपाची आहे ती वगळून उर्वरीत माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००९ रोजी दिली आहे. या माहितीमध्ये एकूण ६२ पृष्ठांचा समावेश आहे. सदरची ६२ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली आहे व त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यावर आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी केलेल्या अर्जातील व प्रथम अपिलातील माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तसेच नमूद माहितीपैकी कोणती माहिती आपणास अपूर्ण मिळाली आहे त्याचा खुलासा द्यावा असे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-१०-२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि यावर अपिलार्थीने प्रतिसाद दिला नाही. ही माहिती त्यांनी मुंबई कार्यालयाकडूनही मागितली होती व त्यांच्याकडूनही व त्यांच्या कार्यालयाने ही माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून उपलब्ध असलेली व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद, ७७१, मजीद व्हिला, रसुलपुरा, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सांख्यिक अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टॅण्ड जवळ, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टॅण्ड जवळ, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार, : अपीलकर्ता
रा. नेहरु चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. शर्मा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२७-११-२००९ |

विचाराधीन व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक २२-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. तथापि त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पुढील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित न राहिल्यास आयोगापुढील होणारा युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन निर्णय घेण्यात येईल याची अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार, रा. नेहरु चौक, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख पाशुमियाँ बाबुलाल, : अपीलकर्ता
रा. महाळंगी, पो. चिखली, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख पाशुमियाँ बाबुलाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,<br>उस्मानाबाद - सौ. एस. यु. मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, उस्मानाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. भांडे आर. बी., लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०६-२००९<br>फेरसादर दिनांक<br>११-०१-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक २२-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी आयोगासमोर काहीही माहिती सादर केली नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सध्याचे जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये दिनांक ०१-०४-२००६ ते ३१-०७-२००८ या कालावधीतील स्वस्त धान्य, रॉकेल तपासणी करण्याबाबतची वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या इष्टांकाबाबतची २९ मुद्दयावर माहिती मागितली आहे. याची कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाहीत. तत्कालीन नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद श्री. पवार हे सध्या निलंबीत आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. याची आयोग गंभीर दखल घेत आहे. अपिलार्थी यांनी सरळ माहिती मागितली आहे व ती त्यांना विहित मुदतीत देणे आवश्यक होते. तथापि कागदपत्रे उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांना ही माहिती देता येत नाही. याकरिता जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना स्वतः या प्रकरणी वैयक्तीक लक्ष द्यावे लागेल. त्यांच्या कार्यालयातील अपर जिल्हाधकारी यांच्यामार्फत या सर्व प्रकरणाची चौकशी करावी लागेल. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे कागदपत्रे गहाळ करण्याकरिता तसेच अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे यासाठी जे अधिकारी / कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्याविरुध्द कलम २० (२) मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशी करावी लागेल, अशी शिफारस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष घालून अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या प्रकरणामध्ये त्यांच्या कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत चौकशी करुन या प्रकरणी दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख पाशुमियाँ बाबुलाल, रा. महाळंगी, पो. चिखली, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स. वजीर स. अहमद, : अपीलकर्ता

रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०८

२ सुनावणीची तारीख दि. २७-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित

नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०२-०३-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १२-०३-२००९

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०७-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक १८-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. दोन्ही सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते याची जिल्हाधिकारी, नांदेड यांना दखल घ्यावी लागेल.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहिती-करिता प्रतिपृष्ठ रुपये दोन प्रमाणे शुल्क जमा करावे असे मोघम स्वरुपाचे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०३-२००९ रोजी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते. तथापि वस्तुस्थिती कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस यापूर्वी माहिती दिली नसल्यास ती नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड व या माहितीशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती पुरविण्यास विलंब झाला असल्याकारणाने एकत्रित रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत सादर करावा लागेल. याच्या प्रती संबंधितांवर तामिल करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यावर राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती यापूर्वी दिली नसल्यास ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड व या माहितीशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून

आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. वजीर स. अहमद, रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामनाथ गणपतराव खोड, | : | अपीलकर्ता |
| | रा. शनीमंदिर गल्ली, जुना मोंढा, बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | मुख्याध्यापक, मदनलाल सारडा राजस्थानी प्रा. विद्यालय, पेठ, बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | मुख्याध्यापक, मदनलाल सारडा राजस्थानी प्रा. विद्यालय, पेठ, बीड | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०१-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०२-२००९ फेरसादर दिनांक |

२३-११-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक १८-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मदनलाल सारडा राजस्थानी प्रा. विद्यालय, पेठ, बीड या शाळेच्या संबंधात एकूण सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. ही माहिती पुरविण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा मुख्यायापक, मदनलाल सारडा राजस्थानी प्रा. विद्यालय, पेठ, बीड यांनी दिनांक ०३-१२-२००८ रोजी विहित मुदतीत कलम ७ (१) नुसार रुपये १७० इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देणे सोपे होईल असे अपिलार्थीस कळविले आहे. दिनांक ११-१२-२००८ रोजी अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना जी माहिती देण्यात आली नाही त्याचा उहापोह करुन सात दिवसाच्या आत माहिती द्यावी असा निर्णय दिनांक २७-०१-२००९ रोजी घेतला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या व्दितीय अपिलामध्ये चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. याबाबत कोणती माहिती चुकीची, अपुरी किंवा दिशाभूल करणारी आहे ही बाब अपिलार्थी यांना पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी शाळेशी संबंधित देय असलेली माहिती आहे ती द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास त्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामनाथ गणपतराव खोड, रा. शनीमंदिर गल्ली, जुना मोंढा, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदनलाल सारडा राजस्थानी प्रा. विद्यालय, पेठ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे,<br>रा. लाईन गल्ली, कारंजा रोड, बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक १८-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी

पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, यापूर्वी या प्रकरणात व्दितीय अपिलावर सुनावणी घेऊन आयोगाने दिनांक १८-०६-२००९ रोजी आदेश दिले आहेत की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घ्यावी व निर्णय पारीत करावा. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०६-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीच्या आठ मुद्दयावर व स्वस्त धान्य दुकान क्रमांक ५ व ३४ ची माहिती पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. त्यानुसार मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित असलेली माहिती पूर्णपणे मिळाली आहे. परंतु दुकान क्रमांक ३४ शी संबंधित असलेली माहिती अपूर्ण मिळाली आहे असे दिसून येत आहे. मुद्दा क्रमांक ८ मधील तहसील कार्यालयाची कलम ४ ची माहिती मागितली होती परंतु ती प्राप्त झाली नाही असे अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलात नमूद केले आहे व ही माहिती अवलोकनार्थ देण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले आहे. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ८ मधील माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

त्याचप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत सादर करावा लागेल. ही नोटीस संबंधितांना तामिली करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी बीड यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ८ मधील माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक

असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे, रा. लाईन गल्ली, कारंजा रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शहाजी राजाराम रणदिवे,<br>रा. बिंदुसरा कॉलनी (पश्चिम), डॉ. पैठणकर यांचे<br>पाठीमागे, डी. पी. रोड, राजमाता जिजाऊ मार्ग, बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख, बीड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१६३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक भूमि अभिलेख, बीड<br>- श्रीमती एस. यु. सोनवणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड - श्री. व्हि. ग. धनवट | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०९-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक १८-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०४-२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १९-०६-२००९ रोजी काही माहिती पुरविली आहे. माहितीची संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध न झाल्याने विलंब झाला. नगर भूमापन क्रमांक १४२६ ची कागदपत्रे उपलब्ध झाली असून ती अपिलार्थीस देत आहेत. ती अपिलार्थीस द्यावी लागतील.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी अपूर्ण माहिती मिळाली आहे असे नमूद केले आहे. अर्जदाराने मागितलेल्या माहितीमध्ये सर्व्हे नंबर ६७ तरफ गिराम, बीड मधील भूमापन क्रमांक १४२६ फेर नंबर ३३७२ व ३३८६ बाबतची माहिती मागितली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अद्यापही अपिलार्थीस देता आली नाही. त्याचा शोध घेऊन ती अपिलार्थीस देण्यात यावी. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यावर त्याची पाहणी करावी लागेल आणि त्यात अपूर्ण माहिती आढळल्यास पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शहाजी राजाराम रणदिवे, रा. बिंदुसरा कॉलनी (पश्चिम), डॉ. पैठणकर यांचे पाठीमागे, डी. पी. रोड, राजमाता जिजाऊ मार्ग, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश एस. पाटील, : अपीलकर्ता

रा. निलकंठ अपार्टमेंट, रेल्वेस्टेशन रोड, आर. टी. ओ.
ऑफिसच्या बाजूला, गोळेगावकर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,
परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर,<br>जिल्हा परभणी - श्री. संदिप डोईफोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-११-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक २३-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये मागितलेली माहिती कलम ८ (ज) प्रमाणे देय होत नाही म्हणून देता येणार नाही असे दिनांक १३-०८-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी (शहर) यांनी अपिलार्थीस कळवून त्यांचा अर्ज निकाली काढलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांचा निर्णय बाजूला ठेऊन अपिलार्थीस मागितलेली माहिती देण्यास हरकत नाही असा दिनांक २५-०९-२००९ रोजी निर्णय घेतला व ही बाब अपिलार्थीस कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असल्या-कारणाने जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात दिनांक २८-१०-२००९ रोजी माहिती देण्याचा प्रयत्न केला तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्विकारली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती दिनांक २९-१०-२००९ रोजी अपिलार्थीस पोस्टाने पाठविली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश एस. पाटील, रा. निलकंठ अपार्टमेंट, रेल्वेस्टेशन रोड, आर. टी. ओ. ऑफिसच्या बाजूला, गोळेगावकर कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामराव संभाजी शिंदे, : अपीलकर्ता
रा. भाटेगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ३१-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी

पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जानेवारी २००८ ते २००९ या कालावधीतील हदगांव तहसील कार्यालय येथील सेतू केंद्रातून वितरित होत असलेल्या कागदपत्रांचा तपशील अशी माहिती, अपिलार्थी यांनी निश्चित केलेल्या दहा कलमी तक्त्यामध्ये मागितली आहे. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी त्यांना माहिती मिळाली आहे तथापि ती अपूर्ण मिळाली आहे असे मोघम नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार ज्या स्थितीत माहिती उपलब्ध आहे त्या स्थितीत ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. नव्याने तक्ता तयार करुन त्यामध्ये माहिती देणे अपेक्षित नाही. तसेच प्रश्नार्थक स्वरुपात माहिती देय होत नाही. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामराव संभाजी शिंदे, रा. भाटेगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक रामकिशनराव दरेवार, : अपीलकर्ता
पशूधन विकास अधिकारी गट-अ, पशूवैद्यकीय दवाखाना,
श्रेणी-१, बरबडा, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, पशूसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, पशूसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड<br>- श्री. पुजरवाड बी. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१२-२००८<br>फेरसादर दिनांक |

०४-१२-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ३१-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी मुदतवाढ मिळण्याची विनंती आयोगास केली. जन माहिती अधिकारी यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी असून त्यांनी सन २००५ ते २००८ या तीन वर्षाच्या कालावधी-तील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रवासभत्त्याबाबतची माहिती व त्यावरील कागदपत्रे याची मागणी केली आहे. त्यांच्या कार्यालयात सुमारे ६५ कर्मचारी काम करत आहेत. जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधित कर्मचारी हे अपघात झाल्यामुळे वैद्यकीय रजेवर असून त्यांच्याकडील कार्यभार अन्य कर्मचा-याकडे देण्याची कार्यवाही चालू आहे तेव्हा सदरची माहिती आपणास दिनांक १५-११-२००८ पर्यंत पुरविण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक २७-१०-२००८ रोजी कळविले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक रामकिशनराव दरेवार, पशूधन विकास अधिकारी, पशूवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१, बरबडा, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पशूसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर, : अपीलकर्ता
व्दारा, प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद,
खडकेश्वर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त, लातूर

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४५

२ सुनावणीची तारीख दि. २७-०५-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
पशूधन विकास अधिकारी, प्रादेशिक पशूसंवर्धन सह
आयुक्त कार्यालय, लातूर - डॉ. जी. एम. कुलकर्णी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त, लातूर
- डॉ. के. आर. सिंगल

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १०-०७-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १२-०८-२००९

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०७-०९-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ३०-०९-२००९

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-१०-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-०७-२००९ च्या अर्जान्वये सन २००५-२००६ या कालावधीतील सहा मुद्दयांवर वंधत्व निवारण कार्यक्रम २००५-२००६ यावर विस्तृत अशी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०८-२००९ रोजी माहिती पाठविली असून त्यामध्ये एकूण ६१ पृष्ठांचा समावेश आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ३०-०९-२००९ रोजी निर्णय देताना अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे असे नमूद केले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ६, ७, ८ व ९ ची माहिती दिनांक ०३-१०-२००८ रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन व युक्तिवादामध्ये माहिती खोटी मिळाली आहे, माहिती खोटी देण्यात आली असे नमूद केले आहे. याकरिता त्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, सदरची बाब त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे / संबंधित विभागाच्या सचिवाकडे कळवावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर, व्दारा, प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त,

औरंगाबाद, खडकेश्वर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पशूधन विकास अधिकारी, प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशूसंवर्धन सह आयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतू महादू जंगले, : अपीलकर्ता
गट नं. १५३, प्लॉट नं. ४८, अलोकनगर, सातारा परिसर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
व्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स
लि. मुंबई, जिल्हा कार्यालय, अदालत रोड, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.
हौसिंग फायनान्स लि. मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतू महादू जंगले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स लि. मुंबई, जिल्हा कार्यालय, अदालत रोड, औरंगाबाद - श्री. पी. के. काळे व ॲड. स्मिता राजवैद्य | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सरव्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स लि. मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सौ. शकुंतलाबाई दत्तु थोरात | : | अनुपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. किशोर दत्तु थोरात | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०९-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०६-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स लि. मुंबई, जिल्हा कार्यालय, औरंगाबाद व मुंबई कार्यालयाच्या वकील स्मिता राजवैद्य उपस्थित होत्या. त्यांनी प्रकरणात लेखी युक्तिवाद दाखल करण्यासाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्यांच्या वकील श्रीमती स्मिता राजवैद्य उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या वकील श्रीमती स्मिता राजवैद्य यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स लि. मुंबई ही राज्यस्तरीय संस्था असून ढोबळ प्रमाणात ती वित्त संस्थांना कर्जपुरवठा करत असते. हौसिंगसाठी घरे बांधण्यासाठी कर्जपुरवठा करत असते. औरंगाबाद जिल्ह्यात अशा ४०० आर्थिक संस्था आहेत आणि त्या त्या प्रमाणात महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक संस्था आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या दिनांक १६-०३-२००९ च्या अर्जामध्ये दोन त्रयस्थांच्या घेतलेल्या कर्जाबाबतची विविध मुद्दयावर एकूण ९ विषयावर माहिती मागितली आहे. हे दोन त्रयस्थ कोणत्या संस्थेचे सभासद आहेत ते अपिलार्थीने नमूद केले नसल्यामुळे सदरची माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य होत नाही. ही बाब अपिलार्थीस दिनांक २८-०४-२००९ च्या पत्राने कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांना हे दोन त्रयस्थ कोणत्या संस्थेचे आहेत असे विचारले असता त्याची माहिती अपिलार्थीस नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देणे शक्य होणार नाही, हा जन माहिती अधिकारी केलेला युक्तिवाद योग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतू महादू जंगले, गट नं. १५३, प्लॉट नं. ४८, अलोकनगर, सातारा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स लि. मुंबई, जिल्हा कार्यालय, अदालत रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हौसिंग फायनान्स लि. मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भालेराव रविंद्र गोविंद,<br>प्लॉट नं. ९६, तुळजापुरे नगर, मळवटी रोड, नांदेड नाका, लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅंक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅंक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅंक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - ०१ - श्री. प्र. मा. आचरेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅंक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - ०१ - श्री. तु. अ. पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०८-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णयावर दिनांक नाही |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-१२-२००८ |

या अपिलावर यापूर्वी दि.२२.०३.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापि त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नसल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर अपिलावर आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी वैद्यकीय अधिकारी वर्ग-१, महाराष्ट्र आरोग्य सेवा या पदासाठी अनुसरलेली निवड पध्दत व इतर बाबीबाबत माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार जी माहिती अपिलार्थीस देय होत आहे ती अपिलार्थीस दिनांक १७-०९-२००८ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०३-१२-२००८ रोजी निर्णय निर्गमीत केला आहे. त्यानुसार अपिलार्थीचे अपील अंशतः स्विकारण्यात येत आहे असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने प्रथम अपिलात त्यांच्या मूळ अर्जाच्या व्यतिरिक्त इतर माहिती मागितली आहे.

अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी प्रथम अपिलात जास्तीच्या माहितीची मागणी केल्याचे आढळून येत आहे ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, त्यांना काही माहिती खालीलप्रमाणे मिळाली नाही व त्यावरील आयोगाचे अभिप्राय पुढे दिल्याप्रमाणे आहेत.

१. अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक १ मधील हायर व लोअर स्टँडर्ड ची मागितलेली माहिती देण्यात आली नाही. - तथापि ही बाब त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये नमूद नाही त्यामुळे ती अपिलार्थीस देय होणार नाही.

२. प्रथम अपिलाच्या निर्णयाचा मुद्दा क्रमांक ५ अन्वये मुद्दा क्रमांक २ (अ), (ब) व (क) ची माहिती दिली नाही. - अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ अन्वये सदरील पदासाठी घेतलेल्या तोंडी परिक्षेतील सर्व परिक्षार्थींची जात प्रवर्गासह गुणयादी मागितली आहे. अशी माहिती ठेवली असल्यास अपिलार्थीस द्यावी लागेल. तथापि ही यादी निवड समितीच्या सदस्यांच्या सहीसह देय होणार नाही.

३.    प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये सुनावणीची तारीख, पत्राचा जावक क्रमांक इ.कळविल्या नाहीत. तसेच व्दितीय अपील अधिकाऱ्याचा तपशील दिला नाही इ. - ही जन अपिलीय अधिकारी यांची नजरचूक दिसत आहे. असे भविष्यात घडणार नाही असे पहावे लागेल.

वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी दिल्याचे आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भालेराव रविंद्र गोविंद, प्लॉट नं. ९६, तुळजापुरे नगर, मळवटी रोड, नांदेड नाका, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पांडुरंग मोहन धायतडक,<br>बंदी क्रमांक ३६४९, खुले कारागृह, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मु.), पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>अहमदनगर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>अहमदनगर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मु.), पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>अहमदनगर - श्री. सुहास रा. राणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०९-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-१०-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-१२-२००७

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या संचित रजेच्या पोलीस अहवालाची मागणी केली आहे. ती दुस-या संदर्भात त्यांना पुरविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जान्वये आतापर्यंत त्यांना पुरविण्यात आलेली नाही व ती पुरविण्यात येईल.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जावर विहित मुदतीत माहिती पुरविणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपिक जबाबदार आहेत. संबंधित लिपिक यांचा खुलासा मागवून योग्य ती कारवाई पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना करावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या माहिती अर्जामध्ये ज्या मुद्दयाबद्दल माहिती मागितली आहे त्यातील प्रश्नार्थक खुलासे, स्पष्टीकरणात्मक मुद्दे वगळून तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असलेले मुद्दे विचारात घेऊन इतर मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस कारागृह अधीक्षक, खुले कारागृह, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्यामार्फत तीस दिवसाच्या आत द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित लिपिकाने विलंब केला असल्यामुळे याबाबत चौकशी करुन दोषी आढळल्यास प्रशासकीय कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग मोहन धायतडक, बंदी क्रमांक ३६४९, खुले कारागृह, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मु.), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष, संवर्धन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वाळुज, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नृसिंह विद्यामंदिर, वाळुज,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजयकुमार विष्णूपंत मुळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नृसिंह विद्या मंदिर प्रा.शा.वाळुज,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद - श्री. एस.एस.गायके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एस. व्ही. क्षीरसागर, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेली उर्वरित माहिती त्यांना मिळालेली नाही. ती खालीलप्रमाणे आहे.

"मा.अपीलीय अधिकारी (गट शिक्षणाधिकारी) यांनी संबंधीत मुख्याध्यापक यांना अर्जदारास १) शालेय पोषण आहार शिजवल्याबद्दल मंजुरीसाठी पाठवलेल्या जुलै २००५ पासूनच्या बिलांच्या सर्व प्रती. २) शाळेच्या असणा-या सर्व बॅक पास बुक उता-याच्या प्रती तसेच ३) जुलै २००५ या वर्षापासून शालेय समीतीच्या झालेल्या सर्व बैठकीतील ठरावाच्या प्रती देण्यासाठी वेळोवेळी तोंडी आदेश देवून देखील त्यांनी काहीही दखल न घेता अन्याय केलेला आहे. तरी मा.माहिती आयुक्त साहेबांनी बिले मिळण्या संदर्भात न्याय व सहाय्य करावे ही नम्र विनंती. "

(टीप : अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन आज सोबत आणली आहे.आयोगाचे सूचनेनुसार अपिलार्थी यांना एकूण २०९ पृष्ठांची माहिती विनामूल्य दिली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थी यांनी माहितीची पाहणी करावी, त्यासंदर्भात काही त्रुटी आढळल्यास त्यासंदर्भात पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास त्यासंदर्भातील माहिती पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार विष्णूपंत मुळे, अध्यक्ष, संवर्धन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वाळुज, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नृसिंह विद्या मंदिर प्रा.शा.वाळुज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ए.ए.खान, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) उपविभाग,औरंगाबाद - श्री. आर. बी. बोजलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम,औरंगाबाद - श्री. बी.डी.तोडकरी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की,अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सार्वजनिक बांधकाम उपविभागाअंतर्गत असलेले सुभेदारी विश्रामगहाचे अभियंता,श्री.जोगस यांनी सन २००८ ते २००९ या कालावधीत केलेल्या कामाची विस्तृत स्वरुपाची माहिती जसे, कामाची अंदाजपत्रके,पतमर्यादा,मोजमापपुस्तिका, बीले इ.तपशील मागितलेला आहे. ही माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिला आहे. अपिलार्थीस दि.२३.०७.२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे व त्यासंदर्भातील त्यांची पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखामध्ये उपलब्ध आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए.ए.खान,क्वॉलिटी वर्कशॉप, मकसुद कॉलनी कॉर्नर,ए.के.ट्रेडर्ससमोर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) उपविभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कादरखान, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,महानगरपालिका,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, वॉर्ड ई व फ,महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. ख्वाजा आय.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वॉर्ड इ व फ, महानगरपालिका,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी कार्यकारी अभियंता, श्री. डी.पी.कुलकर्णी यांनी पाणी पुरवठा अंतर्गत सन २००८ ते २०१० या कालावधीमध्ये केलेल्या रेट लिस्ट, ए-वन कामाची, हाताखालील उपअभियंता व अभियंता यांच्याकडील माहिती अशी विशेष स्वरुपात माहिती मागितली आहे. त्यांच्या अधिनस्त बारा शाखा अभियंता कार्यरत होते. या सर्वांकडून माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची असून त्यामुळे त्यांनी कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अन्वये आपणास एखाद्या विशिष्ट कामाची माहिती पाहिजे असल्यास कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांची तपासणी करावी व त्यातील काही आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील, असे दि. ०५.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. या पत्राची प्रत अपिलार्थीस मिळाली असून याबाबतची पोच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अभिलेखावर आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती सशुल्क देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वॉर्ड इ व फ, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३०.०६.२०१० रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना तीन दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केलेले आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची एकूण १३७३४२ पृष्ठे होत असून त्यासाठी एकूण ₹२,७४,६८४/- शुल्क लेखी स्वरुपात दि. ०१.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांची पोच आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने विस्तृत प्रमाणात मागितलेल्या माहितीचे संपूर्ण अभिलेखे पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्याचासुध्दा प्रयत्न केला असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीकडे दोन विकल्प आहेत. यातील पहिला विकल्प - माहिती सशुल्क प्राप्त करुन घेणे किंवा दि. ०५.०५.२०१० रोजीच्या पत्राप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन अभिलेखांची पाहणी करुन काही आवश्यक कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य प्राप्त करुन घेणे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल.यावर अपिलार्थी यांनी त्यांचा विकल्प जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत कळवावा लागेल. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निर्णय घ्यावा लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कादर खान, घर क्र.१-१८-२४,मंजूरपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग,वॉर्ड ई व फ,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वॉर्ड इ व फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एकबाल शाह निसार शाह, : अपीलकर्ता
रा.वैजापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,वैजापूर, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,वैजापूर, जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एकबाल शाह निसार शाह | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वक्फ मंडळाने दिलेल्या आदेशावर काय कार्यवाही झाली व ७/१२ उताऱ्याबाबत माहिती मागितली आहे. ती आतापर्यंत त्यांना मिळाली नाही. उपलब्ध कागदपत्रांवरुन

असे दिसून येत आहे की, तहसीलदार,वैजापूर यांनी दि. २६.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असून नियमाप्रमाणे फी भरुन पाहणी करुन घेऊन जावी, असे कळविले आहे. आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एकबाल शाह निसार शाह, हळदी गल्ली,वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. ज्ञानबा निवृत्ती कावरखे,<br>रा. गोरेगाव, ता.सेनगाव,जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>अमृतराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,<br>केंद्रा बु.,ता.सेनगाव,जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,अमृतराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केंद्रा बु., ता.सेनगाव,जि.हिंगोली - यांचेतर्फे -ॲड.आर.जे.निर्मळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा -शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.१२.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे वकील ॲड.आर.जे. निर्मळ उपस्थित आहेत.

ॲड.निर्मल यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की,अमृतराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,केंद्रा बु.,ता.सेनगाव जि.हिंगोली हे विद्यालय कायमस्वरुपी विनाअनुदानीत असून त्यांना शासनाचे कोणतेही अनुदान यापूर्वी मिळालेले नाही किंवा मिळत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ त्यांच्या संस्थेस व त्यांच्या शाळेस लागू होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.हिंगोली यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानबा निवृत्ती कावरखे, द्वारा- श्री. निवृत्ती नामाजी कावरखे, रा.गोरेगाव,ता.सेनगाव, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,अमृतराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,केंद्रा बु.,ता.सेनगाव जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रल्हाद गोविंदराव रावले, : अपीलकर्ता
रा.सातेफळ, ता.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अव्वल कारकुन (आस्थापना विभाग),
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०९.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर दि. २३.१२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब

तहसीलदार यांनी अपिलार्थीस कळविले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील मागणी केलेली माहिती आस्थापना शाखेत उपलब्ध असून नियमानुसार हस्तगत करावी. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती अपूर्ण मिळाल्याचे दिसून येत आहे व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित खालील दोन मुद्यांवरील माहिती मिळाली नसल्याचे दिसून येत आहे.

१) शासनास दि. २९.०७.२०१० रोजी पाठविलेल्या अहवालासंदर्भातील टिपणीची प्रत.

२) लोकायुक्त यांना पाठविलेल्या पत्राची प्रत.

जन माहिती अधिकारी यांना या दोन मुद्यांबाबत माहितीच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दोन मुद्यांसंदर्भातील माहितीच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रल्हाद गोविंदराव रावले, रा.सातेफळ,पो.हयातनगर, ता.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (आस्थापना विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हर्षवर्धन किशनराव दवणे,<br>रा. समतानगर, पावडेवाडी नाक्याजवळ, पो. यशवंतनगर,<br>नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शारदाभवन एज्युकेशन सोसायटी संचलित इन्स्टिटयूट ऑफ<br>टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट महाविद्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग,<br>शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय परिसर, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>शारदाभवन एज्युकेशन सोसायटी संचलित इन्स्टिटयूट ऑफ<br>टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट महाविद्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग,<br>शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय परिसर, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती अंजू गोवर्धन निलावार | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ३०-१२-२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांनी सुनावणी घेतलेली नाही. तथापि दिनांक १२-०९-२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यावेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे. त्याचप्रमाणे त्रयस्थ यांची बाजू लेखी किवां तोंडी स्वरुपात विचारात घेण्यात यावी. अपिलार्थीने त्रयस्थाची माहिती मागितली असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये त्रयस्थास त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर मागितलेल्या माहितीबाबत व्यापक जनहिताच्या कसोटीवर निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे सदरच्या शिक्षण संस्थेस माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे याचाही निर्णय जन अपिलीय अधिकारी यांना घ्यावा लागेल. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना आयोगाचे निदेश आहेत की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर वर नमूद केल्याप्रमाणे सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड यांच्या-कडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हर्षवर्धन किशनराव दवणे, रा. समतानगर, पावडेवाडी नाक्याजवळ, पो. यशवंतनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, शारदाभवन एज्युकेशन सोसायटी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय परिसर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वामन रंगनाथराव मोरे, | : | अपीलकर्ता |
| | रा. परभणी. | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | सहायक निबंधक,सहकारी संस्था,परभणी | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी | | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी - प्रतिनिधी - श्री. पी.बी.राठोड,प्रमुख लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्ष श्री.कमलाकर राजारामपंत कुलकर्णी यांनी घेतलेल्या कर्जाबाबत तसेच कर्जापोटी ठेवलेल्या स्थावर मालमत्तेबाबतची माहिती व इतर एकूण ११ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,परभणी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ खाली विचारात घेतल्याचे आढळून येत नाही. त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यावर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती उघड करण्यासंदर्भातील बाब तपासून पहावी लागेल. त्याचप्रमाणे पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.परभणी या संस्थेला माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे ही बाब मा. उच्च न्यायालय यांनी पारीत केलेल्या सोसायटीसंदर्भातील निर्णयाची पाहणी करुन ही बाब तपासावी लागेल.याकरिता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांना पुन्हा सुनावणी घ्यावी लागेल व मुद्देनिहाय निर्णय पारित करावा लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत पुन्हा सुनावणी घेऊन आपला मुद्देनिहाय निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. वामनराव रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमतरोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. महादेव भिमराव केंद्रे,<br>रा. भोजनकवाडी, पो धर्मापुरी, तालुका परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय (इ. जी. एस. विभाग), बीड | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२००१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महादेव भिमराव केंद्रे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड<br>-प्रतिनिधी - श्री. श्रीराम बेंडे, नायब तहसीलदार (रोहयो), बीड | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड - प्रतिनिधी - श्री. पी. पी. कुलकर्णी, नायब तहसीलदार (महसूल), परळी | : उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. घोळवे आर. के. | : उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. पी. सी. मुंडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-०१-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०७-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०३-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड मार्फत सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती करण्यात आली होती. ती विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी दोन तलाठ्यांना निलंबीत केलेल्या आदेशाची प्रत जिल्हाधिका-यांच्या सहीमार्फत मागितली होती ती जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने ती स्विकारली. या स्तरावर प्रकरण बंद करण्यात यावे असे सुनावणीच्या वेळी ठरले.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव भिमराव केंद्रे, रा. भोजनकवाडी, पो धर्मापुरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागनाथ राचय्या स्वामी, : अपीलकर्ता
२-६३, 'पार्वती मॅन्शन', कोळे गल्ली, निलंगा,
तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०५-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०४-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित

होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना १४ दिवस विलंबाने माहिती मिळाली आहे व तीही अपूर्ण मिळाली आहे. या व्दितीय अपिलामध्ये ती अपूर्ण माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

१. पेट्रोलपंपधारक, गॅस एजन्सी यांचे संपूर्ण नांवे व पत्ते बाबत अर्धवट माहिती.

२. पुरवठा कर्मचाऱ्यांची माहिती दिली नाही.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना अपिलार्थी यांना यापूर्वी दिलेली माहिती विचारात घेऊन उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे अशी विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पुरवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागनाथ राचय्या स्वामी, २-६३, 'पार्वती मॅन्शन', कोळे गल्ली, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सावंत लक्ष्मण नारायणराव,<br>नागेश कॉलनी, अहमदपूर, तालुका अहमदपूर,<br>जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. डी. एन. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - व्यवस्थापक ओम गॅस एजन्सी, अहमदपूर,<br>श्री. हनुमंत गुंडिबा रोकडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०१-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०६-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०४-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाची मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीचे दिनांक १७-०५-२०११ रोजीचे हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, औरंगाबाद यांना लिहिलेले पत्र असून या पत्राव्दारे गॅस एजन्सीकडून माहिती प्राप्त झाली आहे असे कळविल्याचे दिसून येत आहे. त्रयस्थ पक्ष यांनी सुध्दा आयोगापुढे अपिलार्थीस माहिती देण्यात आली ही बाब स्पष्ट केली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सावंत लक्ष्मण नारायणराव, नागेश कॉलनी, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा

लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपीलकर्ता
मु. पो. साताळा (खुर्द), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी, :
उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०६-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०४-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने सुनावणी

पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जान्वये अपिलार्थीने सन १९९०-९१ या वर्षात महाराष्ट्र शासनाच्या रोहयो अंतर्गत अंबाजोगाई फलोत्पादन योजनेतील लाभधारक शेतक-यांना पायाभूत रासायनिक खतांचा आणि रासायनिक औषधांचा पुरवठा करण्यासाठी साहित्य सामग्री, बँक धनादेशाने ठोक खरेदी करताना लिखित केलेल्या संपूर्ण आर्थिक व्यवहाराची सत्यप्रतीत दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०४-२००९ रोजी कळविले आहे की, आपणास आवश्यक असलेली माहिती पुरविण्याबाबत प्रयत्न करण्यात येत असून माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचप्रमाणे दिनांक २८-०४-२००९ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहावे म्हणजे प्रकरणी निपटारा करणे सुलभ होईल. उपविभागीय कृषि अधिकारी, अंबाजोगाई यांच्या दिनांक ३०-०४-२००९ च्या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती कार्यालयातील उपलब्ध अभिलेख्याप्रमाणे दिली आहे. तसेच दिनांक २८-०४-२००९ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीस असेही कळविण्यात आले आहे की, त्यांनी कार्यालयात उपस्थित राहून त्यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे त्याची पाहणी करुन घेण्यात यावी. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन याबाबत अपिलार्थीचे समाधान झाल्याचे दिसून येत नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात ही माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून दोन दिवस निश्चित करुन अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०११**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु. पो. साताळा (खुर्द), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय त्र्यंबकराव पाथरकर, : अपीलकर्ता
फ्लॅट नं. ७, संकेत रेसिडेन्सी, विनायक नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय त्र्यंबकराव पाथरकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना - श्री. एस. आर. राडीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना - डॉ. व्ही. एस. मुदगल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०६-२००९
फेरसादर दिनांक
२५-०२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०८-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये विभागीय कार्यालयातील सन २००२ ते २००६ या कालावधीतील सुमारे ८० कर्मचा-यांच्या रद्द झालेल्या आठवडी सुट्टीबाबत व्यक्तिशः तपशील मागितला आहे. ही माहिती सर्व शाखेकडून मागितली असून उपलब्ध होण्यास थोडा उशीर होईल व ती लवकरात लवकर देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना यांनी दिनांक ३०-०१-२००९ रोजी अपिलार्थीस कळविल्याचे आढळून येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना यांच्या दिनांक २१-०४-२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रती (१७ पृष्ठे) पाठविल्याचे दिसून येत आहे.

आयोगापुढे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली व अपिलार्थी यांनी सदरची प्राप्त झाली आहे ही बाब मान्य केली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय त्र्यंबकराव पाथरकर, फ्लॅट नं. ७, संकेत रेसिडेन्सी, विनायक नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती राधाबाई बाळकृष्ण त्रिवेदी,<br>मुरली मनोहर मंदिर, कसुपारख गल्ली, सुपारी हनुमान रोड,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,<br>तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,<br>तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी<br>कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०४-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०७-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०८-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दिनांक १३-०२-२००९ च्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०५-२००९ रोजी कळविले आहे की, संबंधित संचिकेचा अभिलेख कक्षामध्ये व संपूर्ण कार्यालयामध्ये शोध घेण्यात येत आहे व संचिका प्राप्त होताच मागितलेली कागदपत्रे पुरविण्यात येतील. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १२-०५-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरची माहिती वीस वर्षापेक्षा जास्त कालावधीची असून अर्जदार यांचा या माहितीशी काहीही संबंध नसल्यामुळे ती देण्याचे नाकारले आहे ही अयोग्य व खेदजनक बाब आहे व अपिलार्थीस ही माहिती तात्काळ उपलब्ध करुन द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, खुलताबाद यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी कळविल्याचे आढळून येत आहे की, संबंधित संचिका अभिलेख कक्षात दिनांक १२-०६-२००९ रोजी मिळून आली आहे व संचिकेवरुन झेरॉक्स प्रत आपणास देण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये अपूर्ण माहिती मिळाली आहे असे नमूद केले आहे व अपूर्ण माहितीमध्ये खालील बाबी नमूद केल्या आहेत.

१. विरमगाव तालुका खुलताबाद गट नं. १०४ सर्वे नंबर ३४ फेर क्रमांक १५२ च्या संचिकेची प्रत व वहितीबाबत १९८६ च्या संचिकेची प्रत.

जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती राधाबाई बाळकृष्ण त्रिवेदी, मुरली मनोहर मंदिर, कसुपारख गल्ली, सुपारी हनुमान रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, : अपीलकर्ता
रा. नरसी, ता.नायगाव,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय नायगाव (खै),
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, नायगाव (खै),
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै),जि.नांदेड - श्री. एस.बी.पोटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नायगाव (खै),जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ (फेरसादर दि.१६.०६.१०) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०२.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी कोणीही उपस्थित नव्हते.त्यामुळे प्रकरणातील वस्तुस्थिती आयोगास समजू शकली नाही म्हणून सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००८ ते २००९ या कालावधीमध्ये नायगाव तहसील अंतर्गत झालेल्या १५ व्या लोकसभा निवडणुकीच्या एकूण खर्चाच्या हिशोबाची एकूण ५ मुद्यांवर तसेच २००७-०९ या कालावधीमध्ये माहिती अधिकार अर्ज किती प्राप्त झाले, या एका मुद्यावर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः स्वीकारणार असल्यामुळे अपिलार्थीस देण्यास्तव दि. ०७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे तयार ठेवण्यात आली होती. तदनंतर सदरची माहिती दि. ११.०८.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस पाठविण्यात आली, ती पोस्टाद्वारे परत प्राप्त झाली व त्यावर पोस्ट खात्याने "घेण्यास इन्कार परत" अशी नोंद घेतली आहे.

यावरुन जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे स्तरावर अपील बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, तालुका उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस, मु.पो.नरसी,ता.नायगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव

(खै),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नायगाव (खै),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तमराव किशनराव जाधव,<br>रा.औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय लेखाधिकारी,<br>राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उत्तमराव किशनराव जाधव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद - श्री. रविंद्र शिवराम आढाव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २५.०२.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी कोणीही उपस्थित नसल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन तसेच अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष - त्यांच्या मुलाच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात एकूण १२ मुद्यांवर माहिती मागितली आहे व त्यामध्ये बऱ्याच मुद्यांवर प्रश्नार्थक खुलासेवजा माहिती मागितली आहे.ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही, म्हणून देय होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेल्या प्रश्नार्थक मुद्यांच्या मागे खालील माहिती अभिप्रेत आहे, असे दिसून येत आहे.

१) वैद्यकीय देयके सादर करण्याच्या कालावधीबाबत शासन निर्णय/परिपत्रक इ.ची प्रत.

२) त्रयस्थ पक्ष - अपिलार्थी यांचा मुलगा यांनी सादर केलेल्या संदर्भित वैद्यकीय देयकांचा तपशील तसेच त्यातील मंजूर केलेल्या देयकांच्या प्रती.

३) त्रयस्थ पक्षाला मंजूर करण्यात आलेल्या वैद्यकीय देयकाच्या प्रती व मंजूर झालेल्या देयकाच्या प्रती.

४) इ.स.२००६ मध्ये उत्सव अग्रीमाच्या मान्यतेची प्रत.

५) वरील उत्सव अग्रीम उचल केलेल्या कागदपत्रांची प्रत.

६) वर नमूद केल्याप्रमाणे उत्सव अग्रीमाचे किती हप्ते देण्यात आले.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ती देण्यात यावी. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक यांना या प्रकरणी आयोगाने दि.०८.०९.२००९ रोजी आदेश देऊनही त्यांनी या प्रकरणी रीतसर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. ही गंभीर बाब आहे. याची दखल उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन,मुंबई यांना घ्यावी लागेल व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास त्याचप्रमाणे प्रथम अपील अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी विहित मुदतीत निर्णय घेतील, याची दक्षता घ्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२)		व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन,मुंबई यांनी त्यांचे अधिनस्त सर्व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात निर्णय घेताना सतर्क राहण्यासाठी त्यांच्यास्तरावर आवश्यक सूचना द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. उत्तमराव किशनराव जाधव, ६१५, अरुणोदय कॉलनी, सिडको,एन-५,औरंगाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	व्यवस्थापकीय संचालक, वाहतुक भवन, डॉ.नायर मार्ग, मुंबई सेंट्रल,मुंबई-८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख रियाज इब्राहीम,<br>रा. वैजापूर,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गावकामगार/तलाठी,<br>मंडळ अधिकारी कार्यालय,वैजापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,वैजापूर,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख रियाज इब्राहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०१.२००९ (फेरसादर दि.२९.०९.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये माहिती व नकला अपूर्ण मिळाल्या आहेत, असे नमूद केले आहे. आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पुढील कार्यवाही अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात त्यांना नव्याने अर्ज करावा लागेल, असे आयोगाने सूचित केले. ही बाब अपिलार्थीने मान्य केली.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख रियाज इब्राहिम, द्वारा - श्री.एकबाल शाह निसार शाह,हलदी गल्ली, वैजापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, विभाग वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>रा. माणिकनगर, माणिकचौक, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०५-२०८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००८ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०४-०२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती व सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ३१-०७-२००८ रोजी निर्णय दिला की, अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून शासकीय माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना अर्धवट व अपूर्ण माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे असे मत आहे की, अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अर्धवट व अपूर्ण स्वरुपात मिळाली ही बाब स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, रा. माणिकनगर, माणिकचौक, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहंमद अब्दुल अजीज इंजिनियर, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवर सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसचिव (सेवा),
सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मो. अब्दुल अजीज इंजिनियर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९.०२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.०३.२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.०५.२००७ (फेरविचार २१.०५.२००८) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. याची आयोग गंभीर दखल घेत आहे. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे प्रकरणाची

सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, (सध्याचे व तत्कालीन) जन माहिती अधिकारी, (सध्याचे व तत्कालीन)जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद अब्दुल अजीज इंजिनियर, घर नं. १-१५-५०, नेहरु भवनजवळ, बुढीलेन,औरंगाबाद - ४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद असीफअली नूरअली, : अपीलकर्ता
जिल्हा परिषद प्रशाला, मांजरी, पो. मांजरी, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. राजेंद्र बाबुराव काळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बि-हाडे एस. एस., विस्तार अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०३-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०५-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०७-२००७

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. त्याबाबत अपिलार्थीचे समाधान झाले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांचे आयोगास लिहिलेले दिनांक ०५-११-२००८ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, विचाराधीन अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागितलेली सर्व माहिती त्यांना मिळाली आहे त्यामुळे सदरचे अपील मागे घेण्यात येत आहे अशी आयोगास विनंती केली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद असीफअली नूरअली, रा. मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.